रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ९०
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

नागोठण्यात प्रियकर आणि मैत्रिणींमार्फत पतीचा खून/२
पनवेल मनपा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान जाहीर/६
रायगड बॅडमिंटन संघाला आणखी एक विजेतेपद/८

## संजय राऊतांकडून सपकाळांची तक्रार; काँग्रेसमध्ये नाराजी



**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाविकास आघाडीत घेण्याच्या हालचालींवरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेस या पक्षांमध्ये मोठे मतभेद समोर आले आहेत. ‘उबाठा’ नेते खासदार संजय राऊत यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात थेट त्यांच्या पक्षश्रेष्ठींना पत्र लिहिल्यामुळे काँग्रेस नेतृत्वाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संजय राऊत यांनी आपल्या पत्रात, हर्षवर्धन सपकाळ यांनी मनसेला आघाडीत घेण्यास विरोध केल्याचा उल्लेख करत त्यांची तक्रार केली होती, मात्र सपकाळ यांच्या पाठीशी काँग्रेस पक्षश्रेष्ठी ठामपणे उभे असल्याचे दिसत आहे. राज ठाकरे यांना सोबत घेतल्यास परप्रांतीय मतदार दुरावण्याची भिती काँग्रेस श्रेष्ठींना वाटत आहे, कारण राज यांची पूर्वीची परप्रांतीयविरोधी भूमिका काँग्रेसच्या राष्ट्रीय धोरणांशी विसंगत आहे.

# लांबलेल्या पावसाचा शेतीला फटका

## रायगडात भातपिकाचे नुकसान; शेतकरी हवालदिल

**अलिबाग : प्रतिनिधी**

भातकापणीचा हंगाम सुरू असतानाच अचानक आलेल्या पावसाने रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पावसामुळे शेतात कापून ठेवलेले भाताचे पीक भिजून नुकसान झाले असून काही ठिकाणी उभे पीक आडवे होऊन शेतातील पाण्यात भिजले आहे. हातातोंडाशी आलेला घास वरुणराजाने हिरावून नेल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे.

सप्टेंबरच्या अखेरच्या दिवसांत झालेल्या जोरदार पावसाने भातपिकाचे नुकसान झाले होते. त्यानंतर पावसाने उघडीप दिली. दसरा होताच शेतकऱ्यांनी भातकापणीला सुरुवात केली. पावसाची भिती असल्याने अनेक शेतकऱ्यांनी कापणी करून शेतातच मळणी आटोपून भात घरात आणण्याकडे लक्ष केंद्रित केले होते. दिवाळी तोंडावर आल्याने मागील चार दिवसांपासून शेतांमध्ये कापणीची लगबग वाढली होती, पण बुधवारी संध्याकाळी पावसाने हजेरी लावली. जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह बरसलेल्या पावसाने शेतात पाणीच पाणी झाले आणि



कापून ठेवलेल्या भातपिकांचे नुकसान झाले. या पावसाचा सर्वाधिक फटका दक्षिण रायगडमधील महाड, पोलादपूर, माणगाव, रोहा या तालुक्यांना बसला. उर्वरित तालुक्यांमध्येदेखील पिकांचे नुकसान झाले आहे. शेतात कापून ठेवलेल्या भाताला मोड (कोंब) येण्याची भिती शेतकऱ्यांना सतावते आहे. त्यामुळे ते वाळवण्याचा प्रयत्न सुरू आहे, मात्र शेतात पाणी असल्याने ते वाळवायचे कुठे हा प्रश्न आहे.

वास्तविक राज्यातील इतर भागांच्या तुलनेत कोकणात पीक परिस्थिती या वर्षी बरी होती. यंदा वार्षिक सरासरीच्या तुलनेत कोकणात कमी पाऊस झाला. तरीही पीक चांगले आले होते. आधी सप्टेंबरअखेरीस आणि आता १५ दिवसांत दोनवेळा पडलेल्या पावसाने शेतीचे नुकसान केले आहे.

## शेकापच्या राजेंद्र पाटीलांवर अखेर अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील यांच्यावर खालच्या पातळीत टीका तसेच नामदेव गायकवाड गुरुजी यांना जातीवाचक शब्दांनी अपमानित केल्याप्रकरणी शेतकरी कामगार पक्षाचे राजेंद्र पाटील यांच्यावर अखेर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमानुसार उलवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक राहिलेले शेकापचे राजेंद्र पाटील नेहमीच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे बदनाम आहेत. धमकावणे, मारहाण, खंडणी अशा गुन्हेगारी स्वरूपाचे अनेक गुन्हे त्यांच्यावर दाखल आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उदघाटन झाल्यानंतर राजेंद्र पाटील यांनी लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील यांच्यावर खालच्या स्तरावर टीका केली होती. त्यामुळे राजेंद्र पाटील यांच्याविरोधात भूमिपुत्रांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. याच विमानतळाच्या अनुषंगाने बौद्ध समाजाचे नामदेव गायकवाड गुरुजी यांनी विमानतळबाधित पुनर्वसन या विषयावर वृत्तवाहिनीला मुलाखत दिली होती, मात्र राजेंद्र पाटील यांनी मुलाखतीचा संदर्भ देत गायकवाड गुरुजींविषयीही अपमानास्पद वक्तव्य केले आहे. या प्रकरणी अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. **(पान २ वर..)**

## नवनियुक्तांना शुभेच्छा!



**पनवेल : भाजपच्या नवीन पनवेल आणि पनवेल मंडळांच्या संघटनात्मक नियुक्त्यांची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. यामध्ये नवीन पनवेल शहर मंडळाच्या महिला मोर्चा अध्यक्षपदी राजश्री वावेकर, दक्षिण भारतीय सेल अध्यक्षपदी यमुना प्रकाशन, युवा मोर्चा अध्यक्षपदी मयुर कदम तसेच पनवेल मंडळ युवा मोर्चा अध्यक्षपदी हिमेश बहिरा व सदस्यपदी अतुल बहिरा, रोहित शिवकर, सूरज परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.** **(वृत्त व अधिक छायाचित्रे पान ३ वर..)**

## रायगडात जय भारतीय जनरल कामगार संघटनेचा डंका



### ‘शेल इंडिया’च्या कामगारांना तब्बल एक लाख २० हजार रुपये बोनस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशातील सर्वात मोठा आणि आनंदाचा सण असलेल्या दीपावलीनिमित्त कामगारांना त्यांच्या आस्थापनांकडून बोनस दिला जातो. यंदा रायगड जिल्ह्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये बोनस वाटपाच्या चर्चांना वेग आला असताना आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेने कामगारांच्या हिताचे भक्कम प्रतिनिधित्व करून तळोजा औद्योगिक क्षेत्रातील शेल इंडिया मार्केट्स प्रा.लि.मधील कामगारांना तब्बल एक लाख २० हजार रुपयांचा सर्वाधिक बोनस मिळवण्यात यश मिळवले आहे.

याचबरोबर पुढील वर्षी एक लाख २५ हजार रुपये आणि त्या पुढील वर्षी एक लाख ३० हजार रुपये कामगारांना बोनस देण्यात येणार आहे. त्या संदर्भातील करार कंपनी आणि कामगार संघटनेत झाला. या करारावर व्यवस्थापनाच्या वतीने अधिकारी शशांक शेखर व गुलशन चौधरी यांनी, तर संघटनेच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी तसेच कामगार प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या. या कंपनीतील बहुतांश कामगारांनी संघटनेचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर कामगारांना भरघोस पगारवाढ व सुविधा देण्यात आल्या होत्या. आता जिल्ह्यात सर्वाधिक बोनस मिळाला आहे. संघटनेच्या या यशामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण असून दिवाळीचा आनंद द्विगुणीत झाला आहे.

संघटनेचे सल्लागार लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची संघटनेचे पदाधिकारी व कामगार प्रतिनिधींनी सदिच्छा भेट घेऊन त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा देत आभार मानले. **(पान २ वर..)**

## पनवेलच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात सोमवारी भव्य दीपोत्सव

**पनवेल** : येत्या सोमवारी (दि. १९) म्हणजेच नरक चतुर्दशीच्या दिवशी सायंकाळी ७ वाजता पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दीपोत्सव २०२५ हा भव्य कार्यक्रम भाजप शहर मंडळ उपाध्यक्ष केदार भगत यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे फायर शो आणि वधू ढोल ताशा पथकाचे शानदार सादरीकरण होणार आहे. याद्वारे दीपावलीत दिव्यांच्या प्रकाशात आणि ढोल ताशाच्या गजरात पनवेलकरांना एक वेगळा अनुभव मिळणार आहे. दीपोत्सव हा आनंद, ऐक्य आणि संस्कृतीचा उत्सव आहे. म्हणूनच नागरिकांनी कुटुंबासह या सोहळ्यात सहभागी व्हावे आणि एकत्रितपणे सण साजरा करावा, असे आवाहन केदार भगत व सहकाऱ्यांनी केले आहे.






# प्रियकर, मैत्रिणीमार्फत पतीचा खून

## ७२ तासांत आरोपी जेरबंद

**नागोठणे : बातमीदार**

आपल्या प्रेमात अडथळा ठरत असलेल्या नवऱ्याचा प्रियकर व प्रियकराची मैत्रीणीच्या मदतीने खून करून पसार झालेल्या आरोपींना नागोठणे पोलिसांनी अतिशय हुशारीने जलद गतीने अवघ्या ७२ तासाच्या आत तांत्रिक व वैज्ञानिक तपासाच्या आधारे जेरबंद केले.

कृष्णा नामदेव खंडवी वय २३ वर्ष रा. गौळावाडी पो. पाबळ ता. पेण हा दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी ०९.०० वाजण्याचे सुमारास नागोठणे येथे आधारकार्ड काढण्यास निघुन गेला असून तो दि.११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत घरी परत आलेला नाही म्हणुन त्याचे वडीलांनी नागोठणे पोलीस स्टेशन मध्ये मिसींगची फिर्याद दिली त्यानंतर पोलिसांनी मिसींग दाखल करून तपास सुरू केला. नागोठणे शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज संकलित करून त्याची पाहणी करून त्या आधारे अधिक तपास केला. तसेच मिसींग व्यक्तीच्या मोबाईल नंबरचा सीडीआर प्राप्त करून त्याचे तांत्रीक विश्लेषन करून त्यामधुन संशयीत नंबर प्राप्त करून त्यांचा सीडीआर/एसडीआर प्राप्त करण्यात आला. केलेल्या तांत्रिक व वैज्ञानिक तपासाच्या आधारे पोलीस पथक तयार करून नाशिक तसेच रायगड परिसरामध्ये सदर गुन्ह्याच्या अनुशंगाने सखोल तपास करण्यात आला




पोलिसांच्या निदर्शनास आले की, मयत कृष्णाची पत्नी दिपाली अशोक निरगुडे ही माणगाव येथे दोन वर्षापासुन नर्सिंगचा कोर्स करीत असल्यामुळे ती तिच्या पतीपासुन वेगळी माणगाव येथे राहत होती. त्याच दरम्यान उमेश सदु महाकाळ याच्यासोबत तिची ओळख झाली. त्यांच्या ओळखीचे रूपांतर प्रेमामध्ये झाले त्यांना लग्न करण्याचे असल्याने त्या दोघांनी व सुप्रिया प्रकाश चौधरी यांनी कट कारस्थान रचुन एक खोटे इन्स्टाग्रामवर पायल वारगुडे नावाचे अकाउंट ओपन केले व मिसींग व्यक्ती कृष्णा याच्याशी सुप्रिया चौधरी हीने व्हाईरा कॉल करून प्रेमाचे खोटे संबध जुळविले. तसेच सदर व्यक्तींवर दोष येवु नये म्हणुन वेगवेगळया व्यक्तींच्या स्कॅनरवरती तिन वेळा ०२ हजार रू ८० रू व ६० रू असे मिसींग व्यक्तीकडून स्विकारून त्यास दि. १० ऑक्टोबर रोजी भेटायला येते असे सांगितले. त्यानंतर उमेश महाकाळ व सुप्रिया चौधरी हे मोटारसायकलवर (एम.एच.१५ / जे.वाय. ०५३९ एच) आले व उमेश महाकाल याने तोंडाला रूमाल व सुप्रिया हीने स्कार्प बांधुन स्वत:ची ओळख पटु नये मिसींग व्यक्ती कृष्णा खंडवी याला दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता नागोठणे एस.टी. स्टॅन्डवर बोलावुन त्यास मोटारसायकलवर उमेश महाकाळ व सुप्रिया चौधरी यांनी मध्ये बसवुन त्यास प्रेमाच्या खोट्या जाळ्यात फसवुन अपहरण करून नागोठणेजवळील वासगाव येथील जंगल भागत नेले. तेथे गेल्यावर उमेश महाकाळ यांने कृष्णाला पाठीमागुन धरले व सुप्रिया चौधरी हिने ओढणीने मरेपर्यंत कृष्णाचा गळा आवळुन खाली पाठीवर व डोक्यावर आपटुन खून केला. त्यांनी कृष्णा मेल्याची खात्री करण्याकरता पुन्हा मयत कृष्णाच्या बुटाची लेस काढून ती मानेभोवती आवळुन मानेला बांधुन ठेवली व कृष्णा मयत झाल्याची खात्री झाल्याने त्याची ओळख पटु नये म्हणुन त्याचा चेहारा, हात व छातीवरती कोणतेतरी केमीकल टाकून पुरावा नष्ट केला तसेच मयत कृष्णा याच्या खिशातुन त्याचा मोबाईल काढून घेऊन बाहेर येऊन आणलेल्या मोटारसायकल वरून दोघे निघून जाऊन पाली गावाच्या हद्दीत मयत कृष्णा खंडवी याचा मोबाईल मधील सिम काढून मोबाईल बंद करून फोडून टाकला.

प्रियकर व प्रियकराची मैत्रीणीच्या मदतीने खुन करून पसार झालेले आरोपी दिपाली अशोक निरगुडे (मयताची पत्नी) रा. मोहाडीवाडी पो. पाबळ ता. पेण, प्रियकर उमेश सदु महाकाळ वय २१ वर्ष रा. बारीमाळ पो. ओझरखेड ता. त्रंबकेश्वर जिल्हा नाशिक व प्रियंकराची मैत्रीण सुप्रिया प्रकाश चौधरी वय १९ वर्षे रा. आडगावदेवळा, पो. शिरस्ता, ता. त्रंबकेश्वर जि. नाशिक यांना नागोठणे पोलिसांनी अतिशय हुशारीने जलद गतीने अवघ्या ७२ तासाच्या आत तांत्रिक व वैज्ञानिक तपासाच्या आधारे जेरबंद केले

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे,उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, पोलिस उपनिरीक्षक सुरज पाटील, ग्रे. पोलिस उपनिरीक्षक नरेश थळकर, पोहा महेश लांगी, प्रशांत भोईर, चंद्रशेखर नागावकर, मपोहेकॉ मनिषा लांगी, दिपा पाटील, पोकॉ प्रकाश हंबीर यांनी उघड केला. नागोठणे पोलिसांच्या या कामगिरी बद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दरम्यान मयत कृष्णा खंडवी याला आरोपी दिपाली निरगुडे हिच्या पासून झालेली दोन वर्षाची मुलगी असल्याची माहिती मिळालेली आहे.

# खालापुरात कंपनीला आग

## वेळीच नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

खालापुरातील सावरोली खारपाडा रस्त्यावरील खरसुंडी गावाजवळ असणाऱ्या कंपनीला पहाटे ४.३० वा सुमारास आग लागली या आगीत संपूर्ण प्लँट आगीच्या भक्ष्यस्थानी पडला असून खोपोली अग्निशमन दलाचे जवान व आसपासच्या सात फायर ब्रिगेडच्या जवानांनी १.३० तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. सुदैवाने कंपनीमध्ये फक्त दिवस पाळीत महीला कामगार काम करीत असल्याने कोणत्याही प्रकारची जीवीतहानी झाली नाही.



खरसुंडी येथे पंचशील इंडस्ट्रिअल इस्टेट मध्ये फिनेल आणि होम क्लीन प्रॉडक्ट बनविणारी कंपनी असून बेसमेंट व फर्स्टक्लोडला या खात्याला आग लागली. आगीत ज्वलनशील पदार्थ असलेल्या फिनेल आणि होम क्लीनर माल आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. आगीत कोणीही जखमी नाही. घटनेची माहिती मिळताच खोपोली अग्निशमन दलाचे जवान मोहन मोरे व त्यांचे पथक फायरबंब घेउन दाखल झाले. तर जेएसडब्लू कंपनी, टाटा स्टील, मंगळम पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील अग्नीशमन दल व एएएनएस कंपनी डोणवत हेल्प फाऊंडेशन टिम दाखल होत तब्बल दिड तासाच्या प्रयत्नानंतर आग पूर्णपणे आटोक्यात आली.

या कारखान्यात दिवस पाळीत १०० च्या आसपास महीला कामगार काम करीत असतात, मात्र आग पहाटे लागल्याने कोणत्याही प्रकारची जीवीतहानी झाली नाही. कारखान्यात आठ सुरक्षा रक्षक स्टाफ होते.

# एसटी ट्रकला धडकली; १० प्रवासी जखमी

**कर्जत : प्रतिनिधी**

पनवेल ते कर्जत दरम्यान प्रवास करत असताना कर्जत आगारातील एसटी बसचा ब्रेक निकामी झाल्याने चालकाचा बस वरील ताबा सुटला आणि बस थेट समोरच्या हायवा ट्रकला धडकली. या अपघातात दहा प्रवासी जखमी झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दुपारी तीनच्या सुमारास हा अपघात झाला.

कर्जत आगाराची बस पनवेलहून कर्जतच्या दिशेने येत असताना पनवेल – कोन मार्गावर अचानक ब्रेक फेल झाल्याने बस समोर उभ्या डंपरला धडकली. यामध्ये दहा प्रवासी जखमी झाले. अपघातानंतर जखमी प्रवाशांना उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

जखमींमध्ये कर्जत येथील बीएससी आयटी शिकणारे विद्यार्थी सत्यम श्रीखंडे आणि चैतन्य लोभी यांचा समावेश आहे.

# माथेरान–नेरळ घाट रस्त्यातील खड्डे डांबराने भरण्याच्या कामाला सुरुवात

**कर्जत : प्रतिनिधी**

पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरान या ठिकाणी जाण्यासाठी असलेल्या एकमेव रस्त्यावर मागील पाच महिने सुरु असलेल्या पावसाने दुरवस्था केली होती. या रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी वाहून नेणारी गटारे बंद झाली आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी डांबरी रस्त्याने वाहत जात असते आणि त्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून नेरळ – माथेरान घाट रस्त्यावरील खड्डे डांबर टाकून भरले जात आहेत. काही दिवसांनी माथेरान येथील पर्यटन हंगाम सुरु होत असल्याने रस्त्याच्या दुरुस्तीबद्दल नेरळ माथेरान टॅक्सी संघटनेकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वनराई आहे आणि त्यामुळे साधारण चार हजार मिलीमीटर पाऊस माथेरान मध्ये होत असतो. माथेरान या ठिकाणी जाण्यासाठी एकमेव रस्ता असून हा रस्ता डांबरी आहे. नेरळ माथेरान दस्तुरी या भागातील आठ किलोमीटर लांबीचा रस्ता डांबरी असून पावसाळ्यात पडणारे पाणी वाहून जाण्यासाठी घाटरस्त्यात एका बाजूने आरसीसी सिमेंटच्या माध्यमातून गटारे बांधण्यात आली आहेत. मात्र घाट रस्त्यातील अनेक गटारे दगडा मातीने भरली असल्याने पावसाळ्यात अशा ठिकाणी पावसाचे पाणी गटारा ऐवजी रस्त्यातून वाहत जाते. त्याचा परिणाम माथेरान घाटातील डांबरी रस्ते खराब होण्याचे प्रमाण मोठे आहे. गतवर्षी नेरळ माथेरान घाटरस्त्यातील नेरळ हुतात्मा चौक ते जुम्मापट्टी या भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण केले नसल्याने या वर्षीच्या पावसाळ्यात घाटरस्त्यात मोठ्या प्रतमानात रस्त्यावर खड्डे पडले आहेत. घाट रस्त्यात प्रामुख्याने जुम्मापट्टी वळण आणि चांगभले वळणावरील खड्ड्यांची मालिका मोठी होती. त्या ठिकाणी अनेक दुचाकी चालक यांना अपघात झाले असून दुचाकी घसरून देखील दुचाकीवरून प्रवास करणाऱ्यांना जखमा झाल्या आहेत.

या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी सातत्याने होत होती. सार्वजनिक बांधकाम खात्याने माथेरान नेरळ कळंब या रस्त्यावरील माथेरान नेरळ घाटरस्त्यातील खड्डे डांबर टाकून भरण्याचे काम सुरु केले आहे. त्या ठिकाणी गोणी मध्ये पॅक असलेल्या डांबराचा वापर खड्डे भरण्यासाठी केला जात आहे. त्यावेळी ज्या ज्या ठिकाणी खड्डे भरण्यासाठी डांबर टाकले जाणार आहे टॅक्सी संघटनेकडून घाटरस्त्यात खड्डे भरले जात असल्याने समाधान व्यक्त केले असून काही दिवसांनी दिवाळी पर्यटन हंगाम सुरु होणार असून या काळात मोठ्या प्रमाणात दिवस रात्र पर्यटकांची रीघ सुरु असते. त्यामुळे पर्यटकांना सुद्धा चांगला रस्ता उपलब्ध होणार आहे.

# भाजप महिला मोर्चाच्या दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी ॲड. मनस्वी मोहिते



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष पदावर ॲड. मनस्वी महेश मोहिते यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा डॉ. चित्रा आस्वाद पाटील यांनी नियुक्तीपत्र देऊन या नेमणुकीची अधिकृत घोषणा केली आहे.

महिला सक्षमीकरणास आणि नेतृत्वाला चालना देणारा हा निर्णय आहे.भाजपा महिला मोर्चा ही संघटना महिला उत्थान आणि समाजातील नारी शक्तीला अग्रक्रम देणारी असून, नव्या नेतृत्वामुळे विविध सामाजिक उपक्रम आणि महत्त्वपूर्ण राजकीय मोहिमांमध्ये महिलांचा सहभाग वाढेल, अशी अपेक्षा आहे.

आगामी काळात महिला मोर्चा अधिक बांधणीला आणि संघटनात्मक कार्यात नवी दिशा देईल. ॲड. मनस्वी मोहिते ह्या त्यांच्या कार्यक्षमता, सामाजिक योगदान आणि महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून परिचित आहेत. महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याच्या आणि विकासाचा नवा अध्याय लिहिण्याच्या दृष्टीने या नेमणुकीची मोलाची भूमिका राहील.

# उद्यानात पेव्हर ब्लॉक बसवा –दर्शना भोईर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील रोहीदास वाडा येथील बालवाडी उद्यानात लावण्यात आलेल्या खेळण्यांच्या ठिकाणी पेव्हर ब्लॉक लावण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पत्राद्वारे पनवेल महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल येथील रोहिदास बाडा येथील बालवाडी उद्यानात महानगरपालिकेकडून खेळणी लावण्यात आलेली असून, या ठिकाणी जास्तीत जास्त चिखल होत आहे. त्यामुळे लहान मुलांना त्या ठिकाणी खेळण्याकरीता गैरसोय होते. त्यामुळे सदरील ठिकाणी पेव्हर ब्लॉक टाकण्यात यावेत अथवा माती टाकण्यात यावी जेणेकरून लहान मुलांना पडल्यानंतर लागणार नाही.

रोहिदास वाडा येथील बालवाड़ी उद्यानात लावण्यात आलेल्या खेळण्यांच्या ठिकाणी पेव्हर ब्लॉक अथवा माती टाकून देण्यात यावी, असेही भोईर यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# नागोठणे जि.प. गटातून सोपान जांबेकर यांना उमेदवारी द्यावी

## भाजप कार्यकर्त्यांची आग्रही मागणी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जिल्हा परिषद उमेदवार हा सर्वसाधारण प्रवर्गाचा असल्यामुळे या जागेवर आपला भाजपचा उमेदवार असावा, अशी सर्वच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी इच्छा व्यक्त केली असून नागोठणे जिल्हा परिषद भाजपचे अधिकृत उमेदवार म्हणून दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर यांच्या नावाचा आग्रह भाजप कार्यकर्त्यांनी एकमुखाने केला आहे.

नागोठणे जिप व पं. स. निवडणूक संदर्भात बुधवारी सायंकाळी भारतीय जनता पक्षाच्या नागोठणे मंडळाची बैठक मंडळ अध्यक्ष महेश जी ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे यांच्या निवासस्थानी घेण्यात आली त्यावेळी कार्यकर्त्यांनी घोषणा केली.



या वेळी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, नागोठणे मंडळ अध्यक्ष महेश ठाकुर, तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, युवा मोर्चा ता. अध्यक्ष निखिल मढवी, महिला मोर्चा ता. अध्यक्ष अपर्णा सुटे, ता. उपाध्यक्ष शसंतोष लाड, ता. यु. मो. सरचिटणीस मोरेश्वर म्हात्रे, उपाध्यक्ष प्रमोद नागोठणेकर, ता. क्रीडा संयोजक शेखर गोळे, शिक्षक सेल ता. अध्यक्ष अशोक अहिरे, विभागीय अध्यक्ष ज्ञानदेव शिर्के, विवेक रावकर, निमेश वाघमारे, संतोष रेवाळे, विठोबा माळी, धनराज उमाळे, गणेश घाग, प्रियांका पिंपळे, मिना माने आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

# शेकापच्या राजेंद्र पाटीलांवर अखेर ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

या अनुषंगाने राजेंद्र पाटील यांच्यावर उलवा पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९चे कलम ३(१) (आर)नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकनेते दि.बा. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य भूमिपुत्रांसाठी वेचले. याची थोडीशीही जाणीव न ठेवता राजेंद्र पाटील यांनी 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील यांचा अपमान करत 'दिबा' आणि त्यांच्या कुटुंबियांचा घोर अपमान केला. त्यामुळे दि.बा. पाटील यांच्या अनुयायांमध्ये राजेंद्र पाटील यांच्याविरोधात संताप उसळला आणि भूमिपुत्रांनी राजेंद्र पाटील यांचा जाहीर निषेध करत आम्ही 'दिबा'साहेबांच्या कुटुंबासोबत आहोत अशी शाश्वती अधोरेखित केली. त्याचबरोबर सेवानिवृत्त मुख्याध्यापक गायकवाड गुरुजी यांचाही राजेंद्र पाटील यांनी अपमान केला.

उलवेमध्ये राहणारे नामदेव रामचंद्र गायकवाड (वय ८३) हे बौद्ध समाजाचे प्रतिष्ठित व्यक्ती आहेत. ते सेवानिवृत्त मुख्याध्यापक असून पेन्शनमधून उदरनिर्वाह चालवतात. शिक्षण क्षेत्रातून सेवानिवृत्त झाल्यानंतर शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी काम केले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटन कार्यक्रमानिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येथे येणार असल्याने लोकमत वृत्तवाहिनीच्या पत्रकारांनी त्यांची मुलाखत घेतली होती. त्या वेळी त्यांनी उलव्याच्या झालेल्या विकासाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कामाचे कौतुक केले होते. त्यामध्ये उलवे हा आमचा खेडेगाव होता, या भागामध्ये शहरीकरण झाल्याने आमच्या गावामध्ये सुधारणा होऊन आम्हाला चांगले दिवस आले व आम्हाला पक्की घरे मिळाली तसेच विमानतळामुळे आमच्या भागातील जमिनींना चांगला भाव मिळाला, असे रोखठोक मत मांडले होते.

या पार्श्वभूमीवर राजेंद्र महादेव पाटील यांनी मात्र रेतीबंदर परिसरात सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्राचा आरसा न्यूज या वृत्तवाहिनीवर मुलाखत देताना त्यांना गायकवाड गुरुजी अनुसूचित जातीचे असल्याचे माहीत असताना जातीचा पाणउतारा करण्याच्या उद्देशाने सर्व लोकांना कळेल अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी उद्देशून 'लाचार होऊन अर्धा किलो मटनासाठी गेलेल्या गायकवाड गुरुजींचा धिक्कार करतो', असे अपशब्द वापरून जाहीरपणे वृत्तवाहिनीवर वक्तव्य करून हेतूपुरस्सर अपमान केला आहे.

वादग्रस्त वक्तव्य, सवंग प्रसिद्धीसाठी दादागिरी व दुसऱ्याचा अपमान करण्याचा ठेका घेणाऱ्या राजेंद्र पाटीलवर गायकवाड गुरुजींनी अखेर उलवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार राजेंद्र पाटील यांच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ कलम ३(१) (आर)नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याबद्दल भूमिपुत्रांनी समाधान व्यक्त केले आहे, तर लवकरात लवकर पोलीस प्रशासनाने कारवाई करावी, अशी अपेक्षा गायकवाड गुरुजींनी व्यक्त केली आहे.

**लोकनेते दि.बा. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य भूमिपुत्रांच्या हक्कासाठी वेचले. त्यांच्या कुटुंबाचा आणि समाजातील ज्येष्ठांचा अपमान हा संपूर्ण भूमिपुत्र समाजाचा अपमान आहे. भूमिपुत्र एकसंघ आहे, त्यामुळे आमच्या नेत्यांचा आणि समाजातील ज्येष्ठांचा अपमान करण्याचा अधिकार राजेंद्र पाटील यांना नाही. आजही अनेक ठिकाणी दलित आणि मागासवर्गीय समाजातील लोक अन्याय, अपमान सहन करत आहेत. अशा परिस्थितीत राजकीय स्थान असलेल्या व्यक्तींकडून जर असा प्रकार घडत असेल, तर त्यावर प्रशासनाने अधिक कडक भूमिका घेतली पाहिजे. कायद्यापुढे कोणताही व्यक्ती मोठा नाही हे दाखवून देण्याची हीच वेळ आहे. समाजाला न्याय मिळावा, पीडितांना आधार मिळावा आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कठोर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. न्याय हा केवळ शब्दांत नाही तर कृतीतून दिसला पाहिजे, तेव्हाच समाज खऱ्या अर्थाने सुरक्षित, समतावादी आणि न्यायप्रिय होईल.**

**–रूपेश धुमाळ, अध्यक्ष,** पनवेल तालुका भाजप पश्चिम मंडळ
अध्यक्ष, आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्था

## रायगडात जय भारतीय जनरल कामगार संघटनेचा डंका

या वेळी रामदास गोंधळी, सुनील पाटील, यासिम शेख, अनिल पावशे, जयराम जाधव, सुनील हरिश्चंद्रकर आदी उपस्थित होते.

संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी याबद्दल बोलताना सांगितले की, कामगारांचे हक्क मिळवण्यासाठी संघटना सदैव तत्पर असते. या वर्षीही अनेक चर्चांनंतर कामगारांना योग्य तो बोनस मिळवून देण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. कामगार आणि कंपनी यांचे नाते घट्ट असले पाहिजे, कारण त्यामुळे कंपनी आणि कामगार यांचे भले होते. जय भारतीय जनरल कामगार संघटना कामगारांच्या हक्कासाठी लढत असते. त्यामुळे ती जबाबदारी घेऊन संघटना काम करत असते, असेही घरत यांनी नमूद केले.

# माजी प्रभारी उपसंचालक अर्चना शंभरकर यांचे निधन

**नवी मुंबई : बातमीदार**

पालघर येथे जिल्हा माहिती अधिकारी आणि कोकण विभागीय माहिती प्रभारी (माजी) उपसंचालक अर्चना शंभरकर यांचे दिर्घकालीन आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पती प्रकाश शंभरकर असा परिवार आहे.



चंद्रपूर येथे २० डिसेंबर १९७३ साली त्यांचा जन्म झाला होता.

डिसेंबर २०२३ मध्ये पालघर जिल्हा माहिती अधिकारी या पदावर अर्चना शंभरकर यांची नियुक्ती झाली होती. त्यानंतर कोकण भवन येथील उपसंचालक म्हणून काही महिन्यांपूर्वी त्यांच्याकडे पदभार देण्यात आला होता. त्यांनी यापूर्वी मुख्यमंत्र्यांचे आणि राज्यपाल यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून देखील काम पाहिले आहेत तर मंत्रालयातील वरिष्ठ सहाय्यक संचालक पदावर देखील त्यांनी काम केले होते. औषध प्रशासन, मराठी भाषा यासारख्या अनेक विभागांसाठी त्यांनी विभागीय संपर्क अधिकारी म्हणून यशस्वीपणे जबाबदारी पार पडली होती.

राज्याच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयातील वृत्तचित्र शाखाप्रमुख मराठी भाषा शाखाप्रमुख यापासून त्यांनी माहिती विभागामध्ये वेगळा ठसा उमटवला होता. गुजरात येथील भूकंप आणि दंगल या पार्श्वभूमीवर लिहिलेली सोलमेट ही कादंबरी वाचकप्रिय ठरली आहे.

# पाणीप्रश्न मार्गी लावा; भाजपची मागणी

## कळंबोलीतही पदाधिकाऱ्यांचे आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे आणि खारघर नंतर आता कळंबोलीतही पाणी प्रश्नावर नागरिक आणि भाजप पदाधिकारी रस्त्यावर उतरले आहेत. सिडकोकडून पुरवठा सुरळीत न झाल्यास संतापाचे वातावरण आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे सिडको प्रशासनाने तातडीने आणि कायमस्वरूपी उपाययोजना करून नागरिकांचा पाणीप्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी आंदोलनातून जोरदारपणे करण्यात आली.

कळंबोली परिसरातील पाण्याचा प्रश्न चिघळला असून ऐन सणासुदीच्या काळातही पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी सिडको कार्यालयावर धडक देत धरणे आंदोलन करण्यात आले. नागरिकांच्या व्यथा सिडको प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले.



गेल्या अनेक दिवसांपासून कळंबोलीत गंभीर पाणीटंचाई निर्माण झाली असून, सणासुदीच्या काळातही नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. सिडकोकडून नियमित पाणीपुरवठा न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण आहे. या असंतोषाचा उद्रेक होऊ नये म्हणून सिडकोने कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी भाजपकडून करण्यात आली.

धरणे आंदोलनादरम्यान अमर पाटील यांनी सिडको प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, येणाऱ्या सोमवारपर्यंत कळंबोलीतील पाण्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास आम्ही सिडको अधिकाऱ्यांना बांगड्या आणि साडी भेट देऊन निष्क्रियतेचा निषेध करू. त्यांच्या या इशाऱ्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

या आंदोलनात भाजपचे जिल्हा चिटणीस रवी पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, रवी भगत, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट, महिला मोर्चा अध्यक्षा मोनिका महानवर, महिला मोर्चा सरचिटणीस सरस्वती कथारा, माजी जिल्हा सहकार सेल अध्यक्ष अशोक मोटे, उपाध्यक्ष मनोरंजन सिंह, सचिव विलास किते, निलेश भोईर, केशव

यादव, अमर ठाकूर, दर्शन पाटील, प्रभाग अध्यक्ष राम महानवर, प्रकाश शेलार, घनश्याम शर्मा, दुर्गा साहानी, अपर्णा सरोज, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, सरचिटणीस निशांत गिल, तसेच विष्णू गायकवाड, संजीत सिंह, मनीष तिवारी, राम पांडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ...अन्यथा तीव्र आंदोलनचा इशारा

आंदोलनात नागरिकांचा मोठा सहभाग होता. अखेर सिडकोच्या अधिकाऱ्यांनी भाजप प्रतिनिधींसोबत चर्चा करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. मात्र, ठरलेल्या मुदतीत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास याहून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपने दिला आहे.



**पनवेल : भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव यांनी दिवाळी सणानिमित्त उटणे वाटपाचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाला. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा तसेच रोशन ठाकूर, प्रवीण मोरबाळे, प्रीतम म्हात्रे, हिमेश बहिरा आदी उपस्थित होते.**

# भाजपच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या नवीन पनवेल आणि पनवेल मंडळाच्या संघटनात्मक नियुक्त्यांच्या घोषणा नुकत्याच करण्यात आल्या आहेत.







यामध्ये नवीन पनवेल शहर मंडळाच्या महिला मोर्चा अध्यक्षपदी राजश्री वावेकर, दक्षीण भारतीय सेल अध्यक्षपदी यमुना प्रकाशन, नवीन पनवेल युवा मोर्चा अध्यक्ष मयुर कदम, तसेच पनवेल मंडळ युवा मोर्चा अध्यक्षपदी हिमेश बहिरा यर सदस्यपदी अतुल बहिरा, रोहित शिवकर, सूरज परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी पनवेल शहर मंडळ माजी नगरसेवक अजय बहिरा, नगरसेवक प्रभाकर बहिरा, अध्यक्ष अध्यक्ष सुमित झुंझारराव, युवा नेते प्रतिक बहिरा, प्रवीण मोरबाळे, मयूर बहिरा, सिद्धी मुंबईकर, आदित्य बहिरा, अभिजित भगत, तन्मय बहिरा, उत्तर रायगड जिल्हा कोषाध्यक्ष अभिलाषा राजेश ठाकूर, नवीन पनवेल शहर मंडळ उत्तर भारतीय सेल अध्यक्ष किरण सिंग कुशवाह, अतुल पाटील प्रीतम धनाजी म्हात्रे, रामा मोरबाळे, सूरज परदेशी, शैलेश कदम, स्वागत मुंबईकर, मयुरेश बहिरा, जयेश बहिरा, रीना पटुंडा, रीना जहा, कंचन सिन्हा, सुधा मिश्रा, संतोश शर्मा, विवेक होन, दीपक औटे, बाळकृष्ण गायकवाड, मोहित शर्मा, गोविंद जाधव, रवी रत्नपारखे, निलेश राठोड, अनिकेत तांदळे, सचिन सुर्वे, चेतन पालकर, ओमकार तारी आदी उपस्थित होते.



# फटाकेमुक्त दिवाळी जागृतीसाठी ग्रीन फेस्टिवल स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेमार्फत 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत ग्रीन फेस्टिवल फटाकेमुक्त दिवाळी या उपक्रमांतर्गत लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पर्यावरणपूरक सण उत्सव साजरे करण्यावरती महापालिकेचा नेहमी कल असतो, त्यानूसार उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना त्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये ग्रीन फेस्टिवल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक दिवाळीचे महत्व पटवून देण्यासाठी आज लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे पणती सजावट, रांगोळी स्पर्धा, कंदील बनवणे व तोरण बनवणे अशा आकर्षक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य डॉ.अविनाश कुलकर्णी, स्पर्धांचे समन्वयक म्हणून रुहाल दुबे यांचे सहकार्य लाभले.

या स्पर्धांमधील १०१ विजेत्यांना महापालिका पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करून सन्मानित करण्यात आले. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. या वेळी 'माझी वसुंधरा'ची प्रतिज्ञा घेण्यात आली.

# उलवे येथे आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससी उलवे येथे पूर्व प्राथमिक ते माध्यमिक आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या वर्गांसाठी दोन दिवसीय १३ व १४ ऑक्टोबर रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये सर्व विभागाच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांचे डोळे तपासणी, दंत तपासणी, बीएमआय चेकप, आरबीएस चेकअप करण्यात आले. या शिबिरासाठी लायन्स क्लब कामोठे यांच्यामार्फत एमजीएम हॉस्पिटल कामोठे, तेरणा डेंटल कॉलेज नेरूळ, अपोलो हॉस्पिटल नेरूळ, डॉ. अगरवाल आय हॉस्पिटल सानपाडा नवी मुंबई, या विविध हॉस्पिटल्सचे तज्ज्ञ डॉक्टर्स व त्यांची टीम यांनी आरोग्य तपासणी केली. सर्वांचे स्कूलच्या मुख्याध्यापिकास मुक्ता खटावकर यांनी आभार मानले.




# पनवेल मनपा शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे माजी राष्ट्रपती आणि महान वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त पनवेल महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.



अतिरिक्त आयुक्त महेश मेघमाळे, उपायुक्त नानासाहेब कामठे, सहायक आयुक्त रुपाली माने तसेच शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी माहिती देण्यात आली. या निमित्ताने पुस्तक प्रदर्शन, सामूहिक वाचन असे विविध उपक्रम घेण्यात आले.

अतिरिक्त आयुक्त महेश मेघमाळे यांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरी स्वतःचे छोटे वाचनालय असावे ही संकल्पना मांडली होती. या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद देत धाकटा खांदा शाळेतील शिक्षिका ज्योत्सना भरडा यांनी आपल्या वर्गातील ४० विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच गोष्टींची पुस्तके असे एकूण २०० पुस्तके वाटप केले. तसेच शाळा क्र. ०६ मध्ये विद्यार्थ्यांना दीपावली अभ्यास पुस्तिका शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या.

# मोहोपाड्यात प्लास्टिक बंदी जनजागृती रॅली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी बिर्ला कार्बन इंडिया कंपनी पाताळगंगा युनिट, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच पिल्लई एचओसी कॉलेज, मोहोपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा बाजारपेठेत प्लास्टिक बंदी जनजागृती रॅली काढण्यात आली.

या उपक्रमांतर्गत बाजारपेठेत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली व नागरिकांना प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांमध्ये लक्ष्मण मोरे (बिर्ला कार्बन इंडिया प्रा. ली.), अरुण गोविंद जाधव (अध्यक्ष, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट), अनिता म्हात्रे (शिक्षिका), कलावती उपाध्याय (शिक्षिका), राजेंद्र रिंगे, निलेश जाधव यांचा समावेश होता. महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




भारत-पाकिस्तान वाघा बॉर्डरवर वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे व त्यांच्या पत्नीसह जीवदानी ग्रुपमधील सहकाऱ्यांच्या पत्नी व मुलीला देशाचा तिरंगा झेंडा घेऊन उपस्थित नागरिकांसमोर देशगीतांवर नृत्य सादर करण्याची संधी मिळाली.

# फुंडे महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा



**उरण : बातमीदार**

भारताचे माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथालय विभागामार्फत वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तक प्रदर्शनात डॉ.अब्दुल कलाम यांनी लिहिलेली आणि तसेच कलाम यांच्याविषयी लिहिलेल्या पुस्तकांची मांडणी करण्यात आली होती.

महाविद्यालयातील डॉ. झेलम झेंडे आणि प्रा. विशाखा पाटील या उपस्थित होत्या. पुस्तक प्रदर्शन कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी केले. दिवसभरात विविध विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी प्रदर्शनास भेट दिली. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने या पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यासाठी ग्रंथालय विभागातील नर्मदा खरपडे व कमल बंगारे यांचे सहकार्य लाभले.




## संपादकीय

# तमसो मा ज्योतिर्गमय

भारत हा सणप्रिय देश आहे. इथे प्रत्येक सण हा केवळ धार्मिक विधी नसून जीवनातील आशा, मूल्ये आणि संस्कृती यांचा उत्सव असतो. त्या सगळ्या सणांमध्ये दिवाळी हा सण असा आहे, जो संपूर्ण देशभर जवळपास सर्वचजण साजरा करतात. या वर्षी दिवाळीची सुरुवात शुक्रवार, १७ ऑक्टोबरपासून वसुबारसने होत आहे.

**दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय, निराशेवर आशेचा विजय आणि वाईटावर चांगल्याचा विजय. रामायणातील कथेनुसार भगवान श्रीरामांनी वनवास संपवून अयोध्येत परतल्यावर लोकांनी घराघरांत दिवे लावले. त्या क्षणाचा अर्थ फक्त स्वागत नव्हता; तर तो होता अंधकार कितीही गडद असो, पण प्रकाश त्याला हरवतोच! दिवाळी तर पाच दिवसांचा प्रकाशोत्सव आहे. प्रत्येक दिवसाची परंपरा आणि प्रतीकात्मकता भारतीय जीवनमूल्यांचे दर्शन घडवते. वसुबारस या दिवशी गोमातेची पूजा केली जाते. गोवंशाचे पूजन म्हणजे निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे. आजच्या औद्योगिक युगातही शेतकऱ्याच्या घरात हा दिवस मातृसंवेदनांचा सण आहे. आरोग्याचे अधिष्ठान असणाऱ्या धन्वंतरी देवाची पूजा धनत्रयोदशी या दिवशी केली जाते, जी १८ ऑक्टोबरला आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती हा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरतो, जिथे जीवनशैलीचे आजार वाढले आहेत. नरक चतुर्दशी या दिवशी तेलाने अंग मळून अभ्यंगस्नान करण्याची परंपरा आहे. ही केवळ शरीरशुद्धी नव्हे, तर मनशुद्धीचाही संस्कार आहे. कृष्णाने नरकासुराचा वध केला, म्हणजेच आपल्या मनातील वाईट विचारांचा नाश करणे हीच खरी 'नरक चतुर्दशी' असून ती २० ऑक्टोबरला आहे. लक्ष्मीपूजन हा दिवाळीचा केंद्रबिंदू. स्वच्छतेत, उजेडात आणि भक्तीतून लक्ष्मीला आमंत्रण देण्याची परंपरा आहे, पण लक्ष्मी ही केवळ धनाची देवी नाही, ती संतुलन, सदाचार आणि कष्टाचा आदर या मूल्यांची देवी आहे. तिचे पूजन यंदा २१ ऑक्टोबरला होईल. पाडवा, जो २२ ऑक्टोबर आहे तो राजा बळी आणि विष्णू यांच्या कथेशी संबंधित हा दिवस पती-पत्नीच्या नात्यातील सन्मान, समर्पण आणि स्नेहाचे प्रतीक आहे. भाऊबीज प्रेम आणि जबाबदारी यांच्या नात्याला साजरे करणारा दिवस २३ ऑक्टोबरला स्नेहभाव वृद्धिंगत करेल. भावंडांतील नात्यातील जिव्हाळा, स्नेह आणि एकमेकांसाठी जगण्याची भावना आजच्या विभक्त होत चाललेल्या नात्यांच्या काळात भाऊबीज अधिक मोलाची ठरते. अर्थव्यवस्थेत थोडे चढउतार असले तरी बाजारपेठा उत्साहाने खुल्या झाल्या आहेत. कपडे, मिठाई आणि सजावटींच्या वस्तूंची बाजारात चलती आहे. अलिकडे स्वदेशी वस्तूंची मागणी वाढली आहे. लोक 'मेड इन इंडिया' वस्तूंना प्राधान्य देत आहेत. दिवाळी केवळ सण नाही, तर तो आत्मप्रकाशाचा प्रवास आहे. घराघरांत लावलेले दिवे, बाजारपेठेतील गजबज, मिठाईचा सुगंध, रांगोळ्यांचे रंग हे सगळे क्षणिक आहे, पण मनातील दिवा पेटला, तर त्याचा प्रकाश वर्षभर टिकतो. म्हणूनच या दिवाळीत फटाक्यांचा आवाज कमी, पण मनाचा प्रकाश अधिक असू दे. नात्यांतील थंडावा नाहीसा करून एकतेचा उबदार प्रकाश पसरवूया. अंधारावर प्रकाशाचा, वैरावर प्रेमाचा आणि निराशेवर आशेचा विजय साकारूया. हवामानाच्या लहरीपणामुळे या वर्षी राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सध्याही काही भागांमध्ये पाऊस पडतोय. त्यामुळे अनेक कुटुंब चिंतेत आहेत. अशा वेळी शासन त्यांना मदत करीत आहेच; त्याचबरोबर स्वयंसेवी संस्था तसेच व्यक्तिगतपणे एकेक हात एकत्र करून शेतकऱ्यांना जीवनापयोगी वस्तू, फराळ भेट दिल्यास त्यांच्याही घरात खऱ्या अर्थाने दिवाळीचा आनंद पसरेल.**

# माथेरानच्या निसर्गसौंदर्याची पर्यटकांना भुरळ





पावसाळ्याचा शेवट आणि हिवाळ्याची चाहूल या दोन ऋतूंच्या संगमावर माथेरान पर्यटनस्थळी निसर्गाने आपल्या सौंदर्याची उधळण केली आहे. सकाळच्या वेळेस पसरलेले आल्हाददायक धुके, डोंगरमाथ्यावर पांढऱ्याशुभ्र ढगांची चादर, चहूकडे पसरलेले हिरवे-पिवळे गवत आणि रंगीबेरंगी रानफुलांनी नटलेली पठारे हे सगळे दृश्य पाहताना निसर्ग जणू स्वतःचा उत्सव साजरा करत असल्याची अनुभूती येत आहे.

सलग सुट्ट्या आल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी दाखल झाले आहेत नेहमी प्रमाणेच माथेरान घाट रस्त्यात वाहनांच्या रांगा लागलेल्या दिसत होत्या. माथेरानमधील प्रत्येक पॉईंटवर आणि मुख्य बाजारपेठेत पर्यटकांची गर्दीच गर्दी दिसत होती. येथील निसर्ग सौंदर्याचा आनंद लुटत धुक्यात हरवलेले माथेरानपण न्याहाळताना पर्यटक दिसत होते.विकेंडला माथेरानला पर्यटकांची खूप गर्दी होताना दिसत आहे. पर्यटकदेखील मुसळधार पावसात घोडेस्वारीची मजा घेताना दिसत आहेत. यामुळे वर्षा पर्यटनासाठी पावसाळी प्रत्येक विकेंडला माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांची तुफान गर्दी पहावयास मिळत आहे.

माथेरान पर्यटनस्थळी आता काही दिवसांत दिवाळी पर्यटन हंगामाला सुरुवात होणार आहे. मुंबई-पुणेच्या पर्यटकांची मोठी मांदियाळी यावेळी माथेरानमध्ये या ठिकाणी पाहवयास मिळते. हजारोंच्या संख्येने पर्यटक माथेरानमध्ये दाखल होत असतात. येथे दिवाळी आगमनाची चाहूल लागत असताना या निसर्गरम्य वातावरणात सृष्टीचा प्रत्येक कण नवजीवनाचा संदेश देत आहे. माथेरानचे अलौकिक निसर्गसौंदर्य सर्वांना पर्यटकांना खुणावत आहे. प्रत्येक पॉईंटवरून नजरेस पडणारा निसर्ग डोळ्यांचे पारणे फेडत आहे. अनेक पर्यटक आपल्या मोबाईल कॅमेऱ्यामधून या मनमोहक दृश्यांची छायाचित्रे टिपत आहेत. सकाळच्या वेळी धुक्यात हरवलेले माथेरान मन प्रसन्न करीत आहे, तर पॉईंटवरून दरीमध्ये उतरलेले ढग पाहण्याचा नजरा काही वेगळाच अनुभव देत आहे. यामुळे यंदाच्या वर्षीचा दिवाळी हंगाम आपल्या निसर्गसौंदर्याची भुरळ येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला पाडणार असे दिसत आहे

माथेरान पर्यटनस्थळाचे मुख्य आकर्षण म्हणून मिनीट्रेनकडे पाहिले जाते. माथेरानच्या आर्थिक जडणघडणीत मिनीट्रेनचा मोठा वाटा आहे. नॅरोगेजवर चालणारी ट्रेन असल्याने या माथेरानच्या राणीला खूप विशेष महत्त्व आहे. दरवर्षी पावसाळ्यात जूनपासून सप्टेंबर महिन्यापर्यंत सुरक्षेच्या कारणास्तव मिनीट्रेन बंद करण्यात येत असते.माथेरानच्या माथ्यावर पाऊस जोरदार कोसळत असतो. यामुळे पावसाळ्यात घाटात दरडी कोसळण्याच्या घटना घडत असतात. यामुळेच मध्ये रेल्वे कडून प्रवाशांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने माथेरान-नेरळ मिनीट्रेन मार्ग बंद ठेवण्यात येत असतो. दसरा सणाच्या शुभमुहूर्तावर किंवा १५ ऑक्टोबर अगोदर घाट सेक्शन मधील कामे पूर्ण करून नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरू केली जाते, मात्र आज १५ ऑक्टोबर दिवस उजाडला तरीदेखील नेरळ-माथेरान मिनिट्रेन सुरू झाली नाही. मिनीट्रेन कधी सुरू होणार असा प्रश्न पर्यटकांकडून स्थानिक नागरिकांकडून तसेच मिनिट्रेन प्रेमी यांच्याकडून विचारला जात आहे. आता लवकरच दिवाळी पर्यटन हंगाम सुरू होणार असून माथेरानच्या राणीची सफर करण्यासाठी पर्यटकांची मांदियाळी येथे पहावयास मिळणार आहे.

दिवाळी पर्यटन हंगामपूर्वी मिनीट्रेन सुरू व्हावी अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. सध्या स्थितीत अमनलॉज स्थानक ते माथेरान रेल्वेस्थानक इथपर्यंत शटल सेवा सुरळीत सुरू आहे.

**-संतोष खाडे, माथेरान**

# मिलनोत्सुक जाई...



शरदाचं टिपूर चांदणं पडलंय. प्रत्येक चांदणी म्हणजे एकेक आठवण. शीतल किरणांनी चंद्र लकाकतोय. कुंद गार वारा सुटलाय. चंद्रबिंब पाण्यात पडून वातावरण अधिकच तेजाळलंय. परसात उमलेली जाई आत फुलू लागलीय. जाईच्या सौम्य गंधानं आसमंत भारून गेलंय.

जाईमध्ये मला आपल्या सख्याची आतुरतेनं वाट पाहणारी स्त्री दिसते. १२ महिन्यांपैकी काही काळच जाई बहरते, मात्र ती जेव्हा फुलते तेव्हा मिलनाच्या ओढीनं ओतप्रोत भरलेली असते.

अत्यंत नाजूक असलेलं जाई हे फुल झुबक्यात येतं. जाईच्या फुलांपेक्षा कळ्यांचा गंध अधिक दरवळतो. ही स्त्रीसुद्धा अशीच असते तिचा सखा तिला भेटणार या विचारांनी इतकी हुरळून गेलेली असते की, तिला कसलंच भान रहात नाही. ओढ, आतुरता, हुरहूर सर्व भाव एकवटतात. हे भाव जाई तिच्या गंधातून तिच्या सख्याला पोहचवते तशीच ती स्त्री तिच्या सर्व भावनांमधून तिच्या प्रियाला सांगत असते.

फुललेली जाई गंधाळलेली असते. समर्पण करण्यासाठी आसुसलेली असते. ही स्त्रीसुद्धा अशीच, तिच्या वागण्या-बोलण्यातूनच नाही तर तिच्या प्रत्येक कृतीतून समर्पण भाव दिसून येतो.

अशा वेळी शांता शेळकेंचं गीत आठवतं...

*तोच चंद्रमा नभात तीच चैत्रयामिनी*
*एकांती मजसमीप तीच तूहि कामिनी!*
*नीरवता ती तशीच धुंद तेच चांदणे*
*छायांनी रेखियले चित्र तेच देखणे*
*जाईचा कुंज तोच तीच गंधमोहिनी*


खरं सांगायचं तर आतल्या आत उलगडते जाई, मनातील अनेक छटा मानातील एका कप्प्यात जतन करत मुकपणे फुलते जाई. तरीही त्याच आवेगानं, मनातील तरल भाव उत्कटपणे फुलवते जाई. सख्याच्या नुसत्या दिसण्यानं बहरते जाई. त्याच्या विचारांमध्ये स्वतःला हरवते जाई. तो येण्याची वाट पाहत उंबऱ्याशीच घुटमळते जाई. त्याला नेत्रात साठवण्यासाठी धडपडते जाई. त्याच्या एका कटाक्षानं मोहरते जाई. सख्याच्या स्पर्शानं शहारते जाई. त्याला गात्रागात्रातच नाही तर प्रत्येक श्वासात साठवते जाई. बंद नयनांनी सख्याच्या मिठीत शिरताना विरघळते जाई. एकरूप होताना प्रियाच्या कुशीत वितळते जाई. त्याच्या प्रेमात स्वतःला बेभानपणे उधळते जाई. परिसस्पर्शानं नव्यानं गंधाळते जाई.

लेखक व.पु. काळे म्हणतात, गंध दान करून फुलाला कोमेजण्याचं बळ येतं. जाईला पाहिल्यावर 'वपुं'चं हे वाक्य किती समर्पक आहे याचा प्रत्यय येतो. रात्री फुलणारी ही जाई पहाटेला अधिकच गंधाळते. गंधाचं दान करून कोमेजून न जाता समईच्या मंद मंद प्रकाशाप्रमाणे उजळून निघते. जाईच्या सहवासात रात्र कधी सरते अन् पहाटेची गोडी कधी लागते कळतच नाही...

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी**



## बदलते तंत्रज्ञान



# 'या' ट्रिकने डिलीट केलेला व्हॉट्सॲप मेसेज वाचू शकता

व्हॉट्सॲप आपल्या युजर्ससाठी नवनवीन फिचर आणि ट्रिक्स आणत असते. वापरकर्त्यांना त्यांचा चांगला फायदा होत असतो. त्यामुळेच व्हॉट्सॲप अनेकांसाठी उपयुक्त ठरते. व्हॉट्सॲप डिलीट केलेल्या मेसेजमध्ये काय होते हे जाणून घेण्याची काही लोकांची खूप इच्छा आहे. जर तुम्हीही अशा लोकांमध्ये असाल तर तुम्हाला डिलीट केलेल्या मेसेजबद्दल अगदी सहज माहिती मिळेल.

तुम्हाला डिलीट केलेले व्हॉट्सॲप मेसेजदेखील वाचायचे असतील तर तुम्ही आता डिलीट केलेले व्हॉट्सॲप मेसेज सहज वाचू शकता.

व्हॉट्सॲप वर डिलीट फॉर एव्हरीवन नावाचे फीचर येतं. या फीचरच्या मदतीने तुम्ही पाठवलेला मेसेज डिलीट करू शकता.

या फीचरनंतर अनेक लोक मेसेज पाठवतात आणि ठराविक वेळेत डिलीट करतात. असं केल्याने काही युजर्स नाराज होतात.डिलीट केलेल्या मेसेजमध्ये काय होते हे जाणून घेण्याची त्यांची खूप इच्छा आहे. जर तुम्हीही अशा लोकांमध्ये असाल तर तुम्हाला डिलीट केलेल्या मेसेजबद्दल अगदी सहज माहिती मिळेल.

यासाठी तुम्हाला फोनमध्ये असलेली एक सेटींग ऑन करावी लागेल.

तुम्हाला तुमच्या फोनमध्ये नोटिफिकेशन्स हिस्ट्री ऑन करावी लागेल. ज्यामुळे तुम्हाला सर्व माहिती मिळेल.

अशा परिस्थितीत, एखादा व्हॉट्सॲप मेसेज पाठवल्यानंतर तो डिलीट केला तरी तुम्ही तो नोटिफिकेशन हिस्ट्रीमध्ये वाचू शकता.

लक्षात ठेवा की, तुम्ही नोटिफिकेशन हिस्ट्रीमध्ये कोणताही ऑडिओ मेसेज, व्हिडीओ किंवा फोटो ॲक्सेस करू शकणार नाही. तुम्ही फक्त मेसेज वाचू शकता.

तुम्ही नोटिफिकेशन बारमधून थेट हिस्ट्रीवर जाऊ शकता किंवा सेटिंग्जमध्ये हा ऑप्शन ओपन करू शकता. येथे तुम्हाला २४ तासांपर्यंतची हिस्ट्री मिळेल.

# गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले



## निमित्त

एक अष्टपैलू, चतुरस्त्र प्रतिभेचे श्रेष्ठ गायक कलावंत; गायनाचार्य व अभिजात नाट्यसंगीताच्या परंपरेचे प्रवर्तक अशी पं भास्करबुवा बखले यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज जयंती. यानिमित्ताने घेतलेला आढावा...

भास्करबुवांचा जन्म १७ ऑक्टोबर १८६९ बडोदे संस्थानातील कठोर या गावी झाला. घरची गरिबी असल्याने प्राथमिक शालेय शिक्षण व त्यानंतर संस्कृत पाठशाळेतले शिक्षण त्यांना फार कष्टाने करावे लागले. त्यांचा आवाज लहानपणापासून गोड असल्यामुळे वर्गशिक्षक त्यांना वारंवार संस्कृत श्लोकपठण करायला लावीत. त्यांच्या या गुणांमुळे पिंगळेबुवा नावाच्या हरिदासाकडे त्यांची संगीत शिक्षणाची सोय झाली. भास्करबुवांच्या आवाजाची कीर्ती पुढे किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीतील भाऊराव कोल्हटकर यांच्या कानी गेली आणि त्यांनी भास्करबुवांना मंडळींत आणले. मंडळीचा मुक्काम इंदूरला असताना भास्करबुवांचा आवाज सुप्रसिध्द बीनकार उस्ताद बंदे अलीखाँ यांनी ऐकला आणि स्वतः होऊन त्यांनी भास्करबुवांना संगीतशिक्षणासाठी गंडा बांधला. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रामराज्यवियोग या नाटकात त्यांनी मंथरेची, तर संगीतसौभद्र या नाटकात नारदाची भूमिका केली. सुमारे दोन वर्षे त्यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीमध्ये काम केले. उच्च दर्जाची गायनकला शिकण्यासाठी ते पुन्हा बडोद्यास आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे गायक उस्ताद फैजमहंमदखाँ यांचे त्यांनी शिष्यत्व पत्करले. चिकाटीने, मेहनतीने व निष्ठेने त्यांनी खाँसाहेबांकडून विद्या प्राप्त केली आणि खानदानी गवयी म्हणून लौकीक प्राप्त केला. त्यांनी गायलेली नाथ हा माझा, मम आत्मा गमला ही नाट्यपदे खूप गाजली.

उस्ताद फैजमहंमदखाँकडून संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांच्याच मार्गदर्शनावरून भास्करबुवांनी आग्रा घराण्याचे उस्ताद नथ्थनखाँ आग्रेवाले यांचा गंडा बांधला. त्यांच्याच सूचनेनुसार त्यांच्या मृत्यूनंतर, भास्करबुवांनी जयपूर घराण्याचे उस्ताद अल्लादियाखाँ यांना गुरू केले आणि त्यांच्या गायकीचे मर्मही आत्मसात केले.

आरंभी किर्लोस्कर आणि नंतर गंधर्व नाटक मंडळीचे ते संगीत गुरू होते. विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी यांसारख्या संगीतनाटकांना संगीत देऊन तसेच बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या समर्थ कलावंतांना तालीम आणि मार्गदर्शन देऊन मराठी नाट्यसंगीताचे दर्जेदार स्वरूप त्यांनी घडविले व नाट्यसंगीतात सौंदर्ययुक्त व भरीव अशी कामगिरी केली. नाट्यसंगीत त्यांनी अभिजात संगीताच्या पातळीवर नेऊन ठेवले. त्यांनीच घडविलेले हे नाट्यसंगीताचे स्वरूप आजही कमी अधिक फरकाने कायम असल्यामुळे त्यांना नाट्यसंगीताचे 'कुलस्वामी' म्हणून संबोधता येईल. मास्तर कृष्णराव, बालगंधर्व, बागलकोटकर, पाटणकरबुवा बापूराव केतकर वगैरे त्यांची शिष्यमंडळी विख्यात होती. गोविंदराव टेबें, र. कृ. फडके, केशवराव भोळे वगैरे कलावंत त्यांना गुरुस्थानी मानीत असत. रसिकांनी त्यांना 'देवगंधर्व' ही मानाची पदवी दिली.त्यांनी पुणे येथे भारत गायन समाज या संस्थेची स्थापना केली (१९११). भास्करबुवांचे पुणे येथे ८ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले. संस्था दरवर्षी त्यांच्या स्मरणार्थ देवगंधर्व संगीत महोत्सवाचे आयोजन करते.


**-सुधीर पोटे (मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# लवकरपेक्षा उशिरा उठणे चांगले? तज्ज्ञ सांगतात...



अनेकजण रात्री उशिरापर्यंत जागे राहतात आणि सकाळी उशीरा उठतात. आपल्याला लहानपणापासून घरात लवकर झोपा लवकर उठा असे शिकवले जाते, मात्र एका नवीन संशोधनात असं समोर आलंय की, लवकर उठण्यापेक्षा उशिरा उठणे चांगले आहे. चांगली झोप तुम्हाला आतून बरे करू शकते आणि पुढील दिवसासाठी तुमच्या शरीराला ऊर्जा देऊ शकते.

न्यूरोसायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार असे आढळून आले की, जे उशिरापर्यंत झोपतात ते बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि स्मरणशक्तीच्या चाचण्यांमध्ये चांगले गुण मिळवतात. या विषयी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना हैदराबादच्या अपोलो हॉस्पिटल्सचे सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी सविस्तर माहिती दिली आहे. डॉ कुमार सांगतात दोन प्रकारचे लोक असतात, एक जे व्यक्ती लवकर झोपणे आणि लवकर उठणे पसंत करतात तसेच त्यांच्या क्रियाकलापांचे नियोजन करतात.

दुसरे म्हणजे, उशिरा झोपणे आणि उशिरा उठणे पसंत करतात तसेच त्यांचे नियोजन करतात. रात्री १२ च्या आधी झोपणे गरजेचे आहे, मात्र हल्ली बरेच जण बारा वाजल्यानंतर झोपतात. याचा अर्थ, जेव्हा लोक झोपेचं चुकीचं वेळापत्र फॉलो करतात तेव्हा ते चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरतात. संशोधनानुसार उशिरा उठल्यानं काही गोष्टींमध्ये आपल्याला फायदा होत असला तरीही नुकसान हे मोठ्या प्रमाणात होतं.

डॉ. कुमार म्हणाले, सात ते नऊ तास झोपण्याची शिफारस केली जाते. सात तासांपेक्षा कमी किंवा नऊ तासांपेक्षा जास्त झोप घेतल्यास एखाद्या व्यक्तीला लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि काही प्रकरणांमध्ये कर्करोग यांसारखे आजार होण्याचा धोका असतो; तर एखाद्या व्यक्तीला चांगल्या झोपेपेक्षा कमी झोप मिळत असेल तर अशा प्रकरणांमध्ये धोका जास्त असतो, असे डॉ. कुमार म्हणाले.

फोनच्या व्यसनामुळे आणि सोशल मीडिया आणि टीव्ही पाहण्याच्या सवयीमुळे आजकाल बहुतेक लोक रात्री उशिरापर्यंत जागे राहतात, त्यामुळे त्यांना चांगली झोप लागत नाही आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतो. मध्यरात्री झोप लागते असं तुमच्याही बाबतीत होत असेल तर अशा परिस्थितीत झोपण्यापूर्वी काही सोपे व्यायाम केल्याने तुम्हाला चांगली झोप येऊ शकते, यामुळे स्नायूंना आराम देण्यासोबतच शरीर लवचिक होण्यासही मदत होते.

## भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ प्रमाणे कलम १९ ची अधिसूचना

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, (कोंढाणे) सिडको, सिबीडी बेलापुर नवी मुंबई यांचेमार्फत कोंढाणे धरण प्रकल्पासाठी मौजे कोंढाणे व चोची ता. कर्जत जि. रायगड येथील जमीन संपादीत करावयाची आहे. सदर संपादनासाठी उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत ता. कर्जत जि. रायगड यांचे कार्यालयाकडून संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उपविभागीय अधिकारी कर्जत यांनी अधिसूचना, क्रमांक उविअ / कात– १ / भूसं/ कलम ११–१/कोंढाणे धरण / २०२५, दिनांक २८ मे २०२५, अन्वये कलम १९ ची अधिसूचना ''आपले महानगर'' वृत्तपत्रामध्ये सोमवार, दि. ३० जुन २०२५ रोजी पृष्ठ क्रमांक ५ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची– दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

त्याअर्थी, मी, उपविभागीय अधिकारी, कर्जत उपविभाग कर्जत, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये अहवाल पाठविलेल्या प्राधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत माझी खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चा– अ नुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) कलम ४३ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने कोंढाणे प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, कर्जत उपविभाग कर्जत यांची अधिनियमाच्या उद्धिष्टांकरिता प्रशासक, पुनर्वसन व पुस्थापना म्हणून नियुक्ती केली आहे. त्याप्रमाणे सदर प्रकल्पामध्ये बाधीत होणाऱ्या कुटूंबाची पाहणी करुन संकलन तक्ता तयार करुन प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच प्रकल्पामध्ये बाधीत होणाऱ्या कूटूंबाचे पुनर्वसन करणेकामी शासकीय / खाजगी जागा निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. अनुसूची–तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून ''निश्चित करण्यासाठी'' निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची– चार मध्ये विनिर्दिष्ट करावयाचा आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्याकरीता संपादन अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (छ) याद्वारे उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत ता. कर्जत जि. रायगड यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याप्रमाणे त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी, असे निर्देश देण्यात येत आहे.

### अनुसूची– एक
### (संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)
### मौजे चोची तालुका–कर्जत, जिल्हा – रायगड

| अ.क्र. | गावाचे नाव | स.नं./ग.नं. | | क्षेत्र हे. आर./पो.ख. | संपादन करावयाचे क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | चोची | १ | २ | ०.४३० | ०.४३० |
| २ | चोची | १ | ३ | ०.०२० | ०.२० |
| ३ | चोची | २ | १ | १.३९९ | १.३९९ |
| ४ | चोची | २ | २ | ०.२१० | ०.२१० |
| ५ | चोची | २ | ३ | ०.०४० | ०.०४० |
| ६ | चोची | ३ | १ | ०.४२५ | ०.४२५ |
| ७ | चोची | ३ | ३ | १.५५८ | १.५५८ |
| ८ | चोची | ३ | ४ | ०.४१५ | ०.४१५ |
| ९ | चोची | ३ | ५ | ०.५३६ | ०.५३६ |
| १० | चोची | ३ | ६ | ०.३१४ | ०.३१४ |
| ११ | चोची | ३ | ७ | ०.७२८ | ०.७२८ |
| १२ | चोची | ४ | १ | ५.७५० | ५.७५० |
| १३ | चोची | ५ | २ | ०.१७० | ०.१७० |
| १४ | चोची | ५ | ३ | ०.१५० | ०.१५० |
| १५ | चोची | ५ | ४ | ०.६८० | ०.६८० |
| १६ | चोची | ६ | २ | १.४२० | १.४२० |
| १७ | चोची | ८ | ० | ०.७६० | ०.७६० |
| १८ | चोची | ९ | १ | १.५९० | १.५९० |
| १९ | चोची | ९ | २ | ०.७८७ | ०.७८७ |
| २० | चोची | ९ | ३ | ०.९९१ | ०.९९१ |
| २१ | चोची | ९ | ४ | ०.५४४ | ०.५४४ |
| २२ | चोची | ९ | ५ | ०.५५० | ०.५५० |
| २३ | चोची | ३६ | ० | ०.४८३ | ०.४८३ |
| २४ | चोची | ३७ | १ | १.२१५ | १.२१५ |
| २५ | चोची | ३८ | १ | ०.७५३ | ०.७५३ |
| २६ | चोची | ३८ | ३अ | ०.३१० | ०.३१० |
| २७ | चोची | ३९ | १/२ | ०.१२५ | ०.१२५ |
| २८ | चोची | ३९ | १/३ | ०.६११ | ०.६११ |
| २९ | चोची | ४९ | ० | ०.२६० | ०.२६० |
| | | | **एकूण** | **२३.२२४** | **२३.२२४** |

**मौजे : कोंढाणे** **तालुका : कर्जत** **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | स.नं./हि.नं./ग्रा.पं./घर/ मालमत्ता क्रमांक | | क्षेत्र हे. आर./पो.ख. | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोंढाणे | १९ | ८ | ०.४५० | ०.४५० |
| २ | कोंढाणे | १९ | १० | ०.४८० | ०.४८० |
| ३ | कोंढाणे | २८ | २/ब | ०.१४० | ०.१४० |
| ४ | कोंढाणे | २८ | १०/ब | ०.३४० | ०.३४० |
| ५ | कोंढाणे | २८ | १६ | ०.१६० | ०.१६० |
| ६ | कोंढाणे | २८ | ९ | ०.१६० | ०.१६० |
| ७ | कोंढाणे | २८ | १९ | ०.२८० | ०.२८० |
| ८ | कोंढाणे | २९ | १ | ०.३३० | ०.३३० |
| ९ | कोंढाणे | २९ | ८ | ०.५३० | ०.५३० |
| १० | कोंढाणे | २९ | ११ | १.२१० | १.२१० |
| ११ | कोंढाणे | २९ | १२ | ०.१५० | ०.१५० |
| १२ | कोंढाणे | ३० | १/क | ०.०१० | ०.०१० |
| १३ | कोंढाणे | ३० | १/ड | ०.०१० | ०.०१० |
| १४ | कोंढाणे | ३० | ४/अ | ०.०२८ | ०.०२८ |
| १५ | कोंढाणे | ३० | ४/ब | ०.०१० | ०.०१० |
| १६ | कोंढाणे | ३० | ४/क | ०.००५ | ०.००५ |
| १७ | कोंढाणे | ३० | ४/ड | ०.००५ | ०.००५ |
| १८ | कोंढाणे | ३१ | ४ | ०.२९० | ०.२९० |
| १९ | कोंढाणे | ३२ | ९ | ०.३७६ | ०.३७६ |
| २० | कोंढाणे | ३५ | १ | ०.१३० | ०.१३० |
| २१ | कोंढाणे | ३६ | ७ | ०.३२० | ०.३२० |
| २२ | कोंढाणे | ३६ | ९ | ०.३६० | ०.३६० |
| २३ | कोंढाणे | ३६ | १० | ०.२३० | ०.२३० |
| २४ | कोंढाणे | ३७ | १ | १.६०० | १.६०० |
| २५ | कोंढाणे | ४० | १ | ०.०८३ | ०.०८३ |
| २६ | कोंढाणे | ४० | २ | ०.२४८ | ०.२४८ |
| २७ | कोंढाणे | ४१ | ३ | ०.२३० | ०.२३० |
| २८ | कोंढाणे | ४१ | ८ | ०.०१० | ०.०१० |
| २९ | कोंढाणे | ४१ | ९ | ०.००८ | ०.००८ |
| ३० | कोंढाणे | ४१ | १० | ०.०४३ | ०.०४३ |
| ३१ | कोंढाणे | ४३ | ५ | ०.०२० | ०.०२० |
| ३२ | कोंढाणे | ४४ | १ | ०.१३० | ०.१३० |
| ३३ | कोंढाणे | ४४ | ३ | ०.१४० | ०.१४० |
| ३४ | कोंढाणे | ४४ | ४ | ०.०४० | ०.०४० |
| ३५ | कोंढाणे | ४४ | ५ | ०.०१० | ०.०१० |
| ३६ | कोंढाणे | ४४ | ६ | ०.०२० | ०.०२० |
| ३७ | कोंढाणे | ४४ | ७ | ०.०१० | ०.०१० |
| ३८ | कोंढाणे | ४४ | ८ | ०.०२० | ०.०२० |
| ३९ | कोंढाणे | ४४ | ९ | ०.०१० | ०.०१० |
| ४० | कोंढाणे | ४४ | १० | ०.०३० | ०.०३० |
| ४१ | कोंढाणे | ४४ | ११ | ०.०१० | ०.०१० |
| ४२ | कोंढाणे | ४४ | १२ | ०.०१० | ०.०१० |
| ४३ | कोंढाणे | ४४ | १४ | ०.०३० | ०.०३० |
| ४४ | कोंढाणे | ४४ | १५ | ०.४१० | ०.४१० |
| ४५ | कोंढाणे | ४४ | १६ | ०.०४० | ०.०४० |
| ४६ | कोंढाणे | ४४ | १८/अ | ०.०७० | ०.०७० |
| ४७ | कोंढाणे | ४४ | १८/ब | ०.०१० | ०.०१० |
| ४८ | कोंढाणे | ४४ | १८/क | ०.०२० | ०.०२० |
| ४९ | कोंढाणे | ४४ | १८/ड | ०.०३० | ०.०३० |
| ५० | कोंढाणे | ४४ | १८/इ | ०.०१० | ०.०१० |
| ५१ | कोंढाणे | ४४ | १८/ई | ०.०१० | ०.०१० |
| ५२ | कोंढाणे | ४४ | १८/फ | ०.०१० | ०.०१० |
| ५३ | कोंढाणे | ४६ | ० | ०.४२० | ०.४२० |
| | | **एकूण कोंढाणे** | | **९.७३६** | **९.७३६** |
| | | **एकूण चोची** | | **२३.२२४** | **२३.२२४** |
| | | **एकूण एकंदर** | | **३२.९६०** | **३२.९६०** |

### अनुसूची– दोन
### सार्वजनिक प्रयोजन स्वरुपाचे विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | कोंढाणे धरण प्रकल्प |
| प्रकल्पाचे वर्णन | कोंढाणे धरण प्रकल्प हा मौजे कोंढाणे २३.२२४ हे. आर. मौजे चोची ९.७३६ हे.आर. एकूण ३२.९६० हे. आर. संपादीत करावयाची आहे. |
| समाजाला मिळणारे लाभ | सिडको मर्या. नवी मुंबई यांचे विनंतीनुसार व कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ठरावानुसार सिडको मर्यादीत, नवी मुंबई विकसीत करीत असलेल्या नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ६४४ वर्ग किलोमिटर क्षेत्रातील २७० गावाच्या पिण्याच्या पाण्याची सध्याची आणि भविष्यातील गरज विचारात घेता जलसंपदा विभागाकडील कोंढाणे प्रकल्प सिडको मर्यादीत नवी मुंबई यांजकडून करण्यात येत आहे. |

### अनुसूची तीन
### बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

**१. प्रकल्पाचे बांधकाम :–** कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ठरावानुसार सिडको मर्यादीत, नवी मुंबई विकसीत करीत असलेल्या नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ६४४ वर्ग किलोमिटर क्षेत्रातील २७० गावाच्या पिण्याच्या पाण्याची सध्याची आणि भविष्यातील गरज विचारात घेता जलसंपदा विभागाकडील कोंढाणे प्रकल्प सिडको मर्यादीत नवी मुंबई यांज प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येत आहे.

**२. प्रकल्पाचे परिचालन :–**

३. प्रकल्पाची देखभाल :– कार्यकारी अभियंता ( कोंढाणे) सिडको नवी मुंबई यांजकडून प्रकल्पाचे बांधकाम व देखभाल करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चा–अ नुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) कलम ४३ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने कोंढाणे प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, कर्जत उपविभाग कर्जत यांची अधिनियमाच्या उद्धिष्टांकरिता प्रशासक, पुनर्वसन व पुस्थापना म्हणून नियुक्ती केली आहे. त्याप्रमाणे सदर प्रकल्पामध्ये बाधीत होणाऱ्या कुटूंबाची पाहणी करुन संकलन तक्ता तयार करुन प्रसिध्द करण्यात आला आहे तसेच प्रकल्पामध्ये बाधीत होणाऱ्या कूटूंबाचे पुनर्वसन करणेकामी प्रकल्पबाधीत व्यक्तींच्या सहमतीने शासकीय / खाजगी जागा निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रशासक, पुनर्वसन व पुस्थापना यांचे स्तरावर पुर्नवसन व पुर्नवसाहत योजना जाहीर व प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यान्वीत आहे.

### अनुसूची चार
### (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेल्या सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई – ३२ यांनी त्यांचे अधिसूचना क्र. संकीर्ण – ०१/२०१५ प्र.क्र.३/अ–२/ दि.१३/०३/२०१५ द्वारे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) कोंढाणे पाणी पुरवठा प्रकल्प ता. कर्जत जि. रायगड प्रकल्पांमुळे होणाऱ्या सामाजीक प्रभाव मुल्यांकन ( Social Impact Assement) सिडकोव्दारे नियुक्त सल्लागारामार्फत करण्यात आले आहे. सदर अहवाल कार्यकारी अभियंता (कोढाणे / बाळगंगा) सिडको लि. यांजकडून या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

दिनांक : १४/१०/२०२५
ठिकाण : कर्जत

**सही/–**
**(प्रकाश संकपाळ)**
उपविभागीय अधिकारी,
कर्जत उपविभाग, कर्जत

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/२२०/१४६९/२०२५

## निवडक

### जेएनपीएतून चिनी फटाके जप्त

**उरण :** महसूल गुप्तचर संचालनालय, मुंबईने सोमवारी न्हावा-शेवा बंदरातून ६.३२ कोटी रुपये किमतीचे २० मेट्रिक टन चिनी फटाके जप्त केले आहेत. विश्वसनीय खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनंतर मुंबई महसूल गुप्तचर संचालनालय ही कारवाई केली. तस्करांनी पकडले जाऊ नये म्हणून लेगिंग्जच्या नावाची चुकीची घोषणा करून फटाक्यांची तस्करी केली होती. न्हावा-शेवा बंदरात आलेल्या कंटेनरची तपासणी करताना त्यांना लेगिंग्ज ऐवजी कंटेनरमध्ये ९५ टक्के जागेत लपवून ठेवलेले चिनी मूळचे फटाके आढळून आले. ६०,००० फटाक्यांच्या बॉक्समधून २० मेट्रिक टन चिनी फटाके आढळून आले. या फटाक्यांची किंमत ६.३२ कोटी रुपये आहे.

### कामोठे येथे वृक्षारोपण कार्यक्रम

**पनवेल :** कामोठे वसाहतीतील निसर्गप्रेमी संघटनेकडून वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी वृक्षसंवर्धनाबाबत अध्यक्ष सुनील करपे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला निसर्गप्रेमी संस्था कामोठेचे अध्यक्ष सुनील करपे, कामोठे पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, पोलीस निरीक्षक पगारे, जय पावणेकर, राजाराम पाटील, समाजसेविका शुभांगी खरात, सुरेश खरात, पंकज पाटील, रवी गोवारी आदी उपस्थित होते. या वेळी विविध प्रजातीच्या आंबा, जांभूळ, कडुलिंब, सुपारी, बहावा, तुती, बोगनविलिया, पारिजात, बेगम बहार आदी वृक्षारोपण करण्यात आला.

### विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

**पनवेल :** भैरवदेव विद्यालय, रिटघर, पनवेल तालुका ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या वतीने ११वी व १२ वी विद्यार्थी विद्यार्थीनी व त्याचे पालक वर्गासाठी क्राईम, गुन्हे, सायबर सुरक्षेततेबद्दल हेल्प नंबर १९३०, पोलीस हेल्प नंबर ११२, मोबाईलचा दुरुपयोग, याबद्दल एक मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आला होता. या मार्गदर्शन शिबिरासाठी, पनवेल तालुका सहायक पोलीस निरीक्षक गौरव इंगोले यांनी महिला, भगिनी व पालक वर्ग साठी व विद्यार्थी मित्रासाठी योग्य मार्गदर्शन दिले.

### लोकल गाईड ओळखपत्र प्रदान

**उरण :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत घारापुरी येथील सुशिक्षित बेरोजगारांना लोकल गाईड म्हणून ओळखपत्र देण्यात आले. घारापुरी हे बेट असल्याने बेटावर रोजगारासाठी अन्य कोणताही पर्याय नसल्याने या ओळखपत्रामुळे ग्रामस्थांना रोजगार करण्यास सोपे जाणार आहे. याआधीसुद्धा ग्रामपंचायतमार्फत लोकल गाईड यांना ओळखपत्र देण्यात आले आहे. घारापुरी ग्रामपंचायतच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना सेवा सवलती तळागाळातील जनतेपर्यंत पोहचविण्यात येतात.

# निरनिराळ्या कामांमुळे धुलीकणाची समस्या

## प्रवाशांसह चालक आणि पादचाऱ्यांना मार्गक्रमणात अडथळा

**पनवेल : वार्ताहर**

परिसरात होत असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या बांधकामांमुळे त्याचप्रमाणे विविध रस्त्यांच्या कामामुळे धुळीचे कण येथून ये-जा करणाऱ्या प्रवाशांसह चालक आणि पादचाऱ्यांच्या नाका-तोंडात जात आहेत. त्यामुळे प्रवाशांसह चालक व पादचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. परिणामी खोकला, सर्दी, घसा दुखण्यासारखे आजार वाढण्याची भीती निर्माण झाली आहे.

अनेक विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू असून त्याचप्रमाणे रस्त्यांची कामेही जोरात सुरू आहेत. नुकत्याच झालेल्या पावसाळ्यात अनेक रस्त्यांना खड्डे पडल्याने तेथे माती, खडी टाकून खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले होते. सध्या पावसाचा जोर कमी झाल्यानंतर धुळीचे कण अनेकांच्या नाका-तोंडात जात आहे. त्यामुळे काही जण नाक दाबून, तर काही जण तोंडाला कपडा बांधून प्रवास करीत आहेत.



दुचाकी चालकासह तीन चाकी, चारचाकी या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांमधील चालकांना आणि प्रवाशांना या धुळीचा त्रास होत आहे.

अनेकांना श्वसनाचे आजार निर्माण होण्याची भीती निर्माण झाली असून, काहींना सर्दी, खोकला, घसा दुखण्याचे आजार होऊ लागले आहेत. सरकारी दवाखान्यांसह खासगी दवाखान्यात या आजाराच्या उपचारासाठी रुग्णांची गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

# परतीच्या पावसाने उरण तालुक्यात भातपिके कुजली



**उरण : प्रतिनिधी**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो, मात्र पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचा हा शेतीचा कणा मोडून पडला आहे. सद्यस्थितीत नैसर्गिक आपत्ती, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टीने शेतकरी अक्षरशः उध्वस्त झाला आहे. परतीच्या पावसात शेतकऱ्यांचे सोन्यासारखे भातपीक मातीमोल झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी हवालदिल झाला असून, परतीच्या पावसाने शेतकऱ्यांना रडविले आहे. त्यामुळे भात पिकांचे सरसकट पंचनामे करून, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, सतत कोसळणाऱ्या पावसामुळे उरण तालुक्यातील मोठीजुई, कळंबुसरे, चिरनेर, वशेणी, खोपटे, सारडे, धाकटीजुई, केगाव, नागाव या भागातील अनेक गावातील भातखाचरात पाणीच पाणी झाले असून, भाताची पिके आडवी होऊन पूर्णपणे पाण्यात बुडाली आहेत. यात खाडी विभागातील शेती अक्षरशा पाण्याखाली आली आहे. भात शेतीत गुडघाभर चिखल असून, अशा चिखलात जाऊन शेतकरी भातपिके वाचविण्याचे प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर या भागात कापणीला आलेली भातपिके चिखलात सापडली आहेत. त्याला कोंबदेखील आले आहेत.

त्यामुळे भातपिके कुजून जाण्याची शक्यता आहे. अशी माहिती येथील शेतकरी गोपाळ केणी यांनी दिली. अशा परिस्थितीमुळे वर्षभर लागणारे भाताचे धान्य उपलब्ध होणार नाही. तर दुसरीकडे शेतकऱ्यांना बाजारातील धान्य विकत घेणे परवडणार नाही. त्यामुळे महागाईच्या काळात कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा हा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा ठाकला असून, शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# भाजपच्या स्वस्त दरातील शिध्याला उदंड प्रतिसाद

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीमध्ये भाजपच्या वतीने स्वस्त दरातील किराणा सामान विक्री केंद्र सुरू केल्याने त्याला उदंड प्रतिसाद मिळत असल्याचे सांगण्यात आले आहे.

कळंबोली मध्ये भाजपाकडून किरकोळ बाजारात असलेल्या आवश्यक सामानाची विक्री कमी दरात देण्यासाठी सुरू केलेल्या केंद्रांवर नागरिकांचा अन लाडक्या बहिणीकडून उदंड प्रतिसाद लाभत आहे. बाजारभावापेक्षा स्वस्त दरात दिवाळीसाठी लागणारे अत्यावश्यक किराणा सामान मिळत असल्याने नागरिकांनी आणि लाडक्या बहिणींनी पनवेलचे कार्यसम्राट दमदार आमदार प्रशांत ठाकूर यांना धन्यवाद दिले आहेत.



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोलीतील माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्या सहकार्याने कळंबोलीमध्ये स्वस्त दरातील दिवाळीच्या फराळासाठी लागणाऱ्या किराणा सामानाचे विक्री केंद्र सुरू करण्यात आले होते. त्याला सुमारे ११ हजार लाडक्या बहिणींनी प्रतिसाद देऊन अत्यावश्यक वस्तू खरेदी केल्या. तब्बल १२ टन किराणा सामानाची विक्री झाल्याचे माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासह दिवाळी फराळ वाटप

**उरण :** तालुक्यातील जि.प. शाळा रानसई येथे परिवर्तन प्रतिष्ठान वतीने सोमवारी (दि.१३) सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मनिष पांडुरंग पाटील होते. परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रितम मारुती पाटील, उपाध्यक्ष उमेश म्हात्रे, अक्षय पाटील तसेच सर्व सभासद प्रणित वीरकुद, हितेंद्र मोहिते, राजा वाघेरी, परेश म्हात्रे, मंदार चव्हाण, संतोष कुथे , क्रिश बंडा, नचिकेत पवार, प्रथमेश पाटील, दीक्षा पटेल, युवराज कुथे परिवर्तन प्रतिष्ठान पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# पूरग्रस्त भागात कामोठ्यातून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे रहिवाशी सामाजिक सेवा संस्था, ओम शिव शंकर सेवा मंडळ कामोठे व जय हरी महिला मंडळ कामोठे, संस्थापक अध्यक्ष पोपटशेठ आवारी यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्त भाग बीड व शेवगाव येथे शेतकऱ्यांना दोन गाड्या जीवनावश्यक वस्तू पाठवण्यात आल्या.

या वस्तूंची किंमत जवळजवळ सहा लाख रुपये होती. हे करत असताना, पोपटशेठ आवारे, सुवर्णा वाळुंज, वर्षा चौधरी, प्रमिला आहेर, गीता उंडे, रंजना ढवन, प्रीती खिलारी संजना वाघमारे, सुप्रिया माने, सुरेखा गुंजाळ संगीता पवार, पुष्पा पोटे, उषा आवारी, साबळे ताई, सत्रे ताई सुजाता चेडे, मनीषा वनवे, शारदा तोंडे, विनंती आंधळे, रंजना शिंदे, लता मोरे, ज्ञानेश्वर सत्रे, शोभा डेरे, ज्योती शिकारे, मंगल आवारी, शुभांगी कड, सुनिता वाबळे, रोहिणी डेरे, जाधवताई, वनिता वाबळे, पल्लवी आवारी या सर्वांनी या सर्व वस्तु कामोठेमध्ये फिरून जमा केल्या.

मंडळातील सर्व सहकारी महिलानी या सर्व वस्तू पॅकिंग केल्या. मंडळाचे कार्यकर्ते दादाभाऊ वाळुंज, संदीप पोटे, योगेश चौगुले, अनिल पोटे, रवी बोहोत यांनी मदत केली. पोपटशेठ आवारे, सुरेश ढवन, आत्माराम आरोटे, बाबाजी ढोमे या सर्वांनी बीड आणि शेवगाव येथे जाऊन वस्तु प्रत्येक गरजु व्यक्तीपर्यंत पोहच केल्या. या वेळी मंडळाचे अध्यक्ष पोपट आवारे यांचे सर्व बिडकर आणि शेवगावकरांनी आभार मानले.

# फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई परिसरात सायबर फसवणुकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सायबर गुन्हेगार प्रामुख्याने शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये जास्तीचा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांना लक्ष्य करत आहेत.

यंदाच्या वर्षातील पहिल्या १० महिन्यांच्या मध्यांतरापर्यंत नवी मुंबईत सायबर फसवणुकीचे २६७ गुन्हे दाखल झाले असून, यामध्ये तब्बल ९१ कोटी ६७ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे.

यंदा जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीत २६७ गुन्ह्यांत ९० कोटींहून अधिक रुपयांचे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे आर्थिक व्यवहार आणि तंत्रज्ञानाची माहिती असलेल्या उच्चशिक्षित व्यक्ती तसेच सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक या फसवणुकीला जास्त बळी पडत आहेत. सायबर चोऱ्या थांबविण्यासाठी नवी मुंबई पोलीस दलात राज्यात प्रथमच फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट स्थापन करण्यात आले आहे. जनजागृती आणि तातडीने तक्रार दाखल करून केलेल्या कारवाईमुळे यंदा दाखल झालेल्या २३६ गुन्ह्यांपैकी ७२ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

सायबर फसवणुकीबाबत नवी मुंबई पोलीस दलाच्या ८८२८११२११२ या हेल्पलाईनवर पीडितांनी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर नेमके पुढे काय करावे, याबद्दल पीडिताला त्वरित मार्गदर्शन केले जाते.

# पनवेल मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त ३२ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतील विविध विभागांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्ताने आयुक्त मंगेश चितळे यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षाकरिता महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांना ३२ हजार रूपये तसेच प्राथमिक शिक्षकांना, एनयुएलएम व पीएमएवाय अधिकारी यांना रूपये १० हजार, परिश्रमिक अधिकारी, एनयुएचएम यांना सात हजार व आशा वर्कर व गट प्रर्वतक यांना सात हजार सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे.



या सानुग्रह अनुदानांतर्गत महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीवरील पाच अधिकारी, आस्थापनेवरील अधिकारी व कमर्चारी ८२५, प्राथमिक शिक्षक ६८, एनयुएलएम अधिकारी दोन, एनयुएचएम अधिकारी २, परिश्रमिक अधिकारी १७, एनयुएचएम अधिकारी २०४, कर्मचारी आणि आशा वर्कर, गटप्रवर्तक अशा मिळून २०४ एकूण एक हजार ३२६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार आहे.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, या निर्णयामुळे पनवेल महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळून त्यांच्या कार्यक्षमता व सेवाभावना अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, सानुग्रह अनुदानाच्या रकमेत लक्षणीय वाढ करावी, अशी सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांना केली होती.

### वेध दिवाळीचे



**उरण : दिवाळी सणाला थोडेच दिवस राहिल्याने बाजारपेठेमध्ये पणत्या, आकाशकंदील, दिवे, रांगोळी, सजावटीचे साहित्य, खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. आनंद नगर, मुख्य बाजारपेठेत विविध आकाराच्या, रंगीबेरंगी पणत्या, आकाशकंदील, रांगोळीचे ठसे विक्रीसाठी दाखल झाले आहेत. दिवाळीचा सण आनंदात साजरा करण्यासाठी नागरिकांची जय्यत तयारी सुरू आहे.**

# ज्येष्ठांनी मोबाईलचा वापर जपून करावा -आयपीएस राजपूत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑनलाईन फ्राड झाल्यास लवकरात लवकर संबंधिताने पोलिस ठाण्यात तक्रार करावी, जेवढी लवकर तक्रार दाखल होईल तेवढे नुकसान कमी होईल, आजच्या काळात जवळचा शत्रू आणि मित्रही मोबाईलच आहे असे सांगताना ज्येष्ठ नागरिकांनी मोबाईलचा वापर जपून करावा असे आवाहन आयपीएस डॉ. बाळसिंग राजपूत यांनी केले.



पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता संवाद' कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके सभागृह येथे करण्यात आले होते. यावेळी 'सायबर सुरक्षा' या विषयावर ते बोलत होते.

या वेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त मंगल माळवे, सचिव अक्षय कदम, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर उपस्थित होते.

या वेळी राजपुत यांनी, ज्येष्ठ नागरिकांना सायबर गुन्ह्याचे विविध प्रकार सांगून सतर्कता बाळगण्याबाबत मार्गदर्शन केले. फोनचा वापर सतर्कतेने करताना वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याविषयी सूचना दिल्या.

'ज्येष्ठ नागरिकांसमवेत कृतज्ञता संवाद' कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०:३० वाजता आरोग्य तपासणी शिबिराने करण्यात आली. महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त यांनी महेशकुमार मेघमाळे यांनी या शिबिराचे उदघाटन केले.

दुपारच्या सत्रात जेष्ठ नागरिकांच्या हक्कांविषयी माहिती देताना ॲड.श्रीनिवास क्षीरसागर यांनी संविधान, मार्गदर्शक तत्त्वे तसेच जेष्ठ नागरिकत्व कायदा, ज्येष्ठांच्या मूलभूत गरजा, जेष्ठ नागरिकांचे हक्क, त्यांच्या समस्या, त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले.

आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड, पंतप्रधान जन आरोग्य योजना अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात आले.

# महिला उद्योजिकांसाठी 'दिवाळी मेळा'मध्ये सुवर्णसंधी!

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळीचा सणाच्या पार्श्वभूमीवर महिला उद्योजकांना स्वतःची कला आणि व्यवसाय प्रदर्शित करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने दिव्या वैभव गायकवाड फाउंडेशनतर्फे एक दिवसीय भव्य दिवाळी प्रदर्शन व विक्री मेळा शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ३.३० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत वाशीतील सेक्रेड हार्ट शाळेजवळील रोटरी क्लब हॉल, सेक्टर ६, वाशी, नवी मुंबई येथे पार पडणार आहे.

येथील सर्व स्टॉल्स महिलांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिलांकडून कोणतेही भाडे आकारले जाणार नाही, जेणेकरून नवोदित उद्योजिकांना कोणताही आर्थिक अडथळा येऊ नये. प्रदर्शनात सहभागी महिला उद्योजिकांनी स्वतःच्या हातांनी बनवलेल्या आकर्षक व उपयुक्त वस्तू विक्रीसाठी ठेवल्या आहेत. त्यात समाविष्ट आहे दिवाळी फराळ व गोडधोड पदार्थ,आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या, तोरणं, रोषणाईसाठी विविध प्रकारचे दिवे,साड्या, कुर्ते, हॅन्डबॅग, इमीटेशन ज्वेलरी,कॉस्मेटिक व घरगुती मसाले

कॅलिग्राफी कार्ड्स, गिफ्ट आर्टिकल्स, खत, आणि कॉर्पोरेट गिफ्ट्स खाद्यप्रेमींसाठीही खास मराठमोळ्या व गुजराती पदार्थांचा आस्वाद उपलब्ध असेल. ऑनलाईन शॉपिंग आणि मॉल संस्कृतीच्या वाढत्या काळात, लघु उद्योजक महिला व्यवसायिकांना प्रत्यक्ष ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळावी, यासाठी हा उपक्रम एक उत्तम व्यासपीठ ठरणार आहे.

या भव्य दिवाळी मेळ्याला वाशी, नवी मुंबई परिसरातील सर्व नागरिकांनी आणि कुटुंबियांनी उपस्थित राहून महिला उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# रोह्यात पावसामुळे भातशेतीचे नुकसान

## आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन





**धाटाव : प्रतिनिधी**

दिवाळीच्या उंबरठ्यावर असतानाच परतीच्या पावसाने शेतकर्‍यांच्या आशा-आकांक्षांवर अक्षरशः पाणी फेरले आहे. बुधवारी सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास वादळी वार्‍यासह झालेल्या मुसळधार पावसाने रोहा तालुक्यातील भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे.

धाटाव, खांब, विरजोली, सुतारवाडी, देवकान्हे, चणेरा, तांबडी, मेढा, धामणसई आणि यशवंत खार या परिसरांमध्ये विशेषतः नुकसानाचे प्रमाण गंभीर असल्याचे स्थानिक शेतकर्‍यांनी सांगितले. हाता-तोंडाशी आलेले भातपिक पावसाने हिरावून घेतल्याने शेतकर्‍यांच्या चेहर्‍यावर हतबलतेचे सावट पसरले आहे. काही दिवसांपूर्वीच शेतकर्‍यांनी हवामानाचा अंदाज पाहून कापणीला सुरुवात केली होती, मात्र अचानक आलेल्या या मुसळधार पावसामुळे उभ्या तसेच कापणी केलेल्या भातपिकाचे मोठे नुकसान झाले आहे. आधीच मागील पावसामुळे नुकसान सहन केलेल्या शेतकर्‍यांचे उरलेसुरले पिकही आता पाण्यात बुडाले आहे.

दरम्यान, तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी शेतकर्‍यांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. परतीचा पाऊस अजून पूर्णपणे ओसरलेला नाही. आजदेखील काही भागात पावसाची शक्यता असून, ज्यांनी भातपिकाची कापणी केली आहे त्यांनी ते पिक तत्काळ झोडून घ्यावे. त्यामुळे पुढील नुकसान कमी होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

तसेच त्यांनी पुढे सांगितले की, येत्या ३० तारखेला हवामान खात्याने वादळी वार्‍यासह पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे शेतकर्‍यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीकामे करावीत. ज्या शेतकर्‍यांचे नुकसान झाले आहे त्यांनी तत्काळ आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, जेणेकरून पंचनामे करून मदतीची प्रक्रिया त्वरीत सुरू करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकर्‍यांच्या या बिकट परिस्थितीत शासनाने तत्काळ मदतीचा हात पुढे करून दिलासा द्यावा, अशी मागणी सर्वत्र होत आहे.

# पत्रकारांनी जागरूक नागरिक म्हणून काम करावे -आंचल दलाल

**अलिबाग : प्रतिनिधी**




पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पत्रकारांनी प्रशासन आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून, एक जागरूक नागरिक म्हणून काम केले पाहिजे, असे मत रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी व्यक्त केले.

अलिबाग प्रेस असोसिएशनचा १७ वा वर्धापनदिन बुधवारी (दि. १५) अलिबाग प्रेस असोसिएशनच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी यावेळी पत्रकारांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार या वेळी उपस्थित होते.

आंचल दलाल आपल्या भाषणात म्हणाल्या की, पत्रकारांनी सत्य माहितीच्या आधारे निष्पक्ष बातम्या द्यायच्या असतात. जबाबदारीचे भान ठेवून काम करायचे असते. अलिबाग प्रेसने नेहमीच सामाजिक भान ठेवून तटस्थ आणि प्रामाणिकपणे रिपोर्टिंग केले आहे.

रायगडमध्ये पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाल्यावर इथल्या प्रसारमाध्यमांनी खूप चांगले सहकार्य केले आहे. पोलीस दलाचे विविध उपक्रम लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पत्रकारांनी मदत केली. अनेक गोष्टींमध्ये मला व्यक्तिगत माहिती नसताना किंवा निर्णय घेताना, अलिबागमधील पत्रकारांनी चांगल्या सूचना केल्या. भविष्यात पोलीस दलाच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्याची आवश्यकता वाटल्यास पत्रकारांनी सूचना कराव्यात. योग्य सूचनांचे स्वागत करू, असेही त्या या वेळी म्हणाल्या.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार म्हणाले की, वाचनाची सुरूवात वृत्तपत्रापासून होते. तरुण पिढीने वृत्तपत्र वाचली पाहिजेत. तुम्ही कोणती वृत्तपत्र वाचता यावरून तुमची वैचारिकता समजते.

अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पोरे यांनी केले. उपाध्यक्ष जितेंद्र शिगवण यांनी स्वागत केले, तर सचिव राजेश भोस्तेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## लायन्स क्लबतर्फे शैक्षणिक साहित्य

**चौक :** कोकण एज्युकेशन स्कुल माजगाव या शाळेला संगणक आणि विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून लायन्स क्लब खालापूर यांनी विद्यार्थी यांच्या शैक्षणिक काळासाठी हातभार लावला. विजय गणांत्रा, ज्योती देशमाने, नागेश देशमाने, किशोर पाटील, जितेंद्र सकपाळ, हरिभाऊ जाधव, भरत पाटील यांच्यासह सरपंच दिपाली पाटील, उपसरपंच अपर्णा शिंदे, रमेश वालकर, राजेश पाटील शशिकांत पाटील, प्रांजल जाधव, वैशाली म्हबडी, वंदना महाबदी, सरिता वाघे, पूनम जाधव, रमेश जाधव, मारुती ढवालकर, बाजीराव ढवाळकर रणधीर पाटील आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यातील १२ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द

**अलिबाग : प्रतिनिधी**

रासायनिक खत विक्रीचा मासिक प्रगती अहवाल सादर नाकारणार्‍या रायगड जिल्ह्यातील १२ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत, अशी माहिती रायगड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी दिली.

रायगड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, यांच्या सूचनांनुसार कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) यांच्याकडून जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांची तपासणी करण्यात आली. यात आढळलेल्या त्रुटींविषयी संबंधित कृषी सेवा केंद्रांना सुधारण्याची वाजवी संधी देण्यात आली, मात्र संधी देऊनही त्रुटी न दूर करणार्‍या केंद्रांवर कारवाई करत १२ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. यंदा एकूण १५ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द झाले असून चार कृषी सेवा केंद्रांचे परवाने तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहेत.

शेतकर्‍यांच्या हितासाठी शासनाच्या सर्व नियमांचे पालन करावे, दरफलक ठळकपणे लावावा, साठा पुस्तके नियमित अद्ययावत ठेवावीत आणि विक्रीवेळी शेतकर्‍यांना आवश्यक पावती व एन फॉर्म द्यावेत, असे आवाहन रायगड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.


**पनवेल महानगरपालिका**
पनवेल, जि. रायगड - ४१० २०६

**परवाना विभाग**
**जाहीर आवाहन**

यावर्षी दि. १८/१०/२०२५ पासून दिवाळी सण सुरु होत असुन, दिवाळी सणामध्ये फटाक्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होत असते. त्यामुळे विक्रेते या व्यवसायाला पसंती देतात. नागरिक मोठ्या प्रमाणामध्ये फटाके खरेदी करीत असतात. मात्र फटाक्यांच्या विक्रीसाठी परवाना आवश्यक आहे. याकामी पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये प्रभाग स्तरावर फटाके विक्रीकरीता दुकानदार/ नागरिक हे महानगरपालिकेकडे तात्पुरते फटाका विक्री करणेकरीता परवानगी मिळणेकामी संबंधित प्रभाग समितीतंर्गत अर्ज करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्रमांक : याचिका २०१६ / प्र.क्र. ४३२ / नवि- २० दि. ०५ नोव्हेंबर २०१६ व जनहित याचिका क्र. १५२/ २०१५ च्या दि. १७ व २५ ऑक्टोबर २०१६ च्या आदेशानुसार फटाका विक्रीची दुकाने खुल्या जागेमध्ये / पटांगणामध्ये विक्रीसाठी असणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादी घटना घडल्यास कमीत कमी नुकसान होईल तसेच फटाक्यांचा साठा आणि विक्री यांचे नियमन व संनियंत्रण करणे शक्य होईल.

शहराच्या गर्दीच्या व गजबजलेल्या मार्गावर, दाट वस्तीच्या भागात फटाके परवाने मंजुर केले जाणार नाही, त्यामुळे या भागातील परवान्यासाठी अर्ज करु नयेत. महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडुन मार्गदर्शक सूचना जारी करणेत आलेल्या आहेत. या सूचनांनुसार फटाका विक्रेत्यांनी सुरक्षेबाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**- विक्री परवान्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१. विहित नमुन्यातील अर्ज, जागेचे ना हरकत प्रमाणपत्र
२. आजुबाजुच्या रहिवाश्यांचे ना हरकत
३. जागेच्या मालकी हक्काबाबतचे कागदपत्र
४. स्थळदर्शक नकाशा, महापालिका अग्निशमन अधिकाऱ्यांचे ना हरकत

**- विक्रेत्यांनी घ्यावयाची काळजी**

१. फटाक्यांची दुकाने समोरासमोर नसावेत.
२. फटाका विक्रीच्या ठिकाणी तेलाचा दिवा, खुला विद्युत दिवा वापरु नये.
३. दुकानाच्या ५० मीटर परिसरामध्ये आतषबाजी करु नये.
४. दुकानात लाकडी रॅंक, कापडी शामीयानाचा वापर करु नये.
५. दुकानात ज्वलनशील पदार्थ ठेवु नये.
६. १८ वर्षांखालील मुलांना फटाके विक्री करु नये.
७. अग्निशमन यंत्रे, बादल्या पुरेशा प्रमाणात ठेवाव्यात.

उक्त प्रमाणे फटाका खरेदी- विक्रीकामी नागरीक व विक्रेत्यांनी आवश्यक बाबींचा अवलंब करावा.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.५३१/५४८/२०२५
दिनांक : १६/१०/२०२५

**सही/-**
**(रविकिरण घोडके)**
उपायुक्त
परवाना विभाग
पनवेल महानगरपालिका



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड - ४१० २०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५३०/५४७/२०२५ दिनांक : १६/१०/२०२५

**माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत**
**फटाकेबंदी व ध्वनीप्रदुषणाबाबत जाहीर आवाहन**

**फटाकेबंदी**

भारत सरकार अधिसुचना क्रमांक GS. R. ६८२ (E), Date. ५.१०.१९९९ बैठक अन्वये १२५ dB (१) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. तसेच आपणा सर्वांना माहितीच आहे कि आपण वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदुषण हे एक महत्वाचे कारण आहे. विविध सण / उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची निर्मिती करतात. हे विषारी वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदुषण थांबवण्याची कृती आपण स्वतः पासून सुरु करु शकतो.

सबब माझी वसुंधरा अभियानांतर्गत येणाऱ्या दिवाळी सण / उत्सवात भारत सरकार अधिसुचना क्रमांक GS.R. ६८२ (E), Date. ५.१०.१९९९ बैठक अन्वये १२५ dB (१) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास/ वाजविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तरी सर्व नागरीकांनी/ फटाके विक्रेते यांनी याची अंमलबजावणी करावी, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच यावर्षीची हो दिवाळी हरित व पर्यावरणपुरक दिवाळी म्हणून साजरी करुयात.

ही दिवाळी आपल्या आणि आपल्या कुटुंबियांसाठी आनंदी व सुरक्षित राहो, दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**ध्वनी प्रदूषण**

पनवेल शहरातील सर्व फटाके विक्रेते आणि नागरीकांना सुचित करण्यात येते की, ध्वनी प्रदुषण म्हणजे त्रासदायक ध्वनी ज्याचा मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर व शरीरावर दुष्परिणाम होतो तसेच नैसर्गिक घटना आणि मानवी कृतीमुळे निर्माण होणाऱ्या उच्च तीव्रता ध्वनीमुळे ध्वनीप्रदुषण होते. औद्योगिक सुविधा, लाऊडस्पीकर, हॉर्न, फटाके, सतत उच्च आवाजात करणारे ध्वनीयंत्र यांच्यामुळे ध्वनी प्रदुषण होते. पनवेल शहरातील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, रहिवासी परिसरात साजरे केले जाणाऱ्या घरगुती व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये उत्सवांमध्ये रात्री १०.०० वाजलेनंतर रहिवासी क्षेत्रामध्ये ४५ dB इतकी ध्वनी मर्यादा ठेवणेसाठी क्षमतेपेक्षा जादा आवाजाचे लाऊडस्पीकर, फटाके ध्वनी प्रदुषण करणारे घटक वाजवण्यात येऊ नयेत. तसे आढळून आल्यास ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम २००० अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

**आवाजाच्या संदर्भात परिसरातील हवेची गुणवत्तेची मानके**

| क्षेत्र | ध्वनीची मर्यादा | |
|---|---|---|
| | दिवसाची वेळ (सकाळी ६.०० ते रात्री १०.०० ) | रात्रीची वेळ ( रात्री १०.०० ते सकाळी ६.००) |
| औद्योगिक क्षेत्र | ७५ dB | ७० dB |
| व्यवसाय क्षेत्र | ६५ dB | ५५ dB |
| रहिवासी क्षेत्र | ५५ dB | ४५ dB |
| शांतता क्षेत्र | ५० dB | ४० dB |

**(सही/-)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
पनवेल महानगरपालिका



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५२६/५४३/२०२५ दिनांक : १६/१०/२०२५

**जाहीर निविदा सूचना**

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| | Tender No. PMC/IT/13/2025 | पनवेल महानगरपालिका पाणी कर संकलन विभागासाठी संगणक प्रणाली अज्ञावली (Software & Hardware) व प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणेबाबत. (१+४ वर्षांसाठी) |

या ई-निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १७/१०/२०२५ ते दि. ०७/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील नगरपालिका कॉम्प्लेक्स मधील **दक्षाबेन महेश पटेल व प्रमिला महादेव पटेल** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील खालील वर्णनाचा गाळा आमचे आशिलांनी भाडेपट्टाकराराने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पनवेल तालुका. पनवेल, जि. रायगड.**

महानगरपालिका कॉम्प्लेक्स (पुर्वीचे नगरपालिका कॉम्प्लेक्स) गाळा क्र.८१, तळ मजला क्षेत्र २८२ चौ. फुट. अंतिम भुखंड क्र. २४७, आरक्षण क्र. २७ व २८ए मधील इमारत क्र. १ व २, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

सबब वर नमुद मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, भाडेपट्टाकरार, बोजा, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा भाडेपट्टाकरार व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १६/१०/२०२५

**सही / -**
**ॲड विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट & लिगल कन्सलटंट)**

शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com



सिडको
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व श्री. सागर सचिन अग्रवाल व श्री. आकाश सचिन अग्रवाल, सर्व राहणार - रा. बी-१७०४, क्षितीज बिल्डींग, भूखंड क्र. ३, सेक्टर १९, सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. पुरूषोत्तम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) कैलास गोकर करोत्रा २) नारायण राघवजी रावरिया ३) अनिल भानजी रावरिया ४) हिरजी राघवजी रावरीया ५) रघु अंबवी पटेल ६) अब्दुल गनी अब्दुल रेहमान दादन ७) प्रदीप भुराभाई पटेल ८) विजय महादेव पटेल ९) वसंत देवजी पटेल १०) रमेश कानजी गजोरा ११) लालजी जिवा चौधरी १२) प्रियांक मेघजी पटेल १३) हरीश मोहनप्रकाश चौधरी १४) रतीलाल देवजी पटेल यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २८२५ | ०९.१०.२०२५ | पुष्पक नोड | २७ | ०१ | ६५७०.०० चौ. मी. | ३०.०६.२०२३ | १८.०७.२०२३<br>२०.०७.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३०२/२०२५-२६



**जाहीर नोटीस**

प्रति,
अध्यक्ष/सचिव/खजिनदार,
ऑलम्पियो रिवरसाईड रेसिडेन्ट को ऑप ही सोसा लि.,
मौजे अवसरे गांव, नेरळ,ता. कर्जत जि. रायगड ४१०१०१ .......अर्जदार
विरुध्द
अनुक्रमांक १ ते १६ ........ जावदेणार

खालील दर्शवलेल्या जाबदेणार यांना नोटिस देण्यात येते की, थकीत देखभाल विषयी अर्जदार संस्थेने या कार्यालयात दिनांक १४/०२/२०२५ रोजी दाखल केलेल्या वसुली अर्जाबाबत आपले म्हणणे सादर करणेकामी आपणांस उपलब्ध पत्यावर नोटीस देण्यात आली होती. त्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत वेळोवेळी विविध कार्यपध्दतीने नोटीस बजावून सुनावण्या घेण्यात आल्या परंतू जाब देणार यांना नोटीस प्राप्त होवून सुध्दा सुनावणीस हजर राहीले नाही, तसेच काही सभासदांच्या नोटीसा या कार्यालयात अपूर्ण पत्ता/अनक्लेम अश्या शेऱ्याने परत आलेल्या आहेत अश्या जाबदेणार यांना सदर जाहीर नोटीसद्वारे आपणांस सदर अर्जाबाबत आपले म्हणणे मांडण्यासाठी अंतिम संधी देण्यात येत असून दिनांक १४/१०/२०२५ रोजी स/दु. ११-३० वाजता आपण स्वतः अथवा अधिकृत व्यक्ती/वकिलामार्फत या कार्यालयात हजर राहून आपले तोंडी /लेखी म्हणणे सादर करावे. तुम्ही गैरहजर राहिल्यास गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येईल व योग्य तो निर्णय केला जाईल. व सदर अर्जाचा निकालही करण्यात येईल. याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी.

| अ.क्र | जाब देणार | फ्लॅट नं. | अर्ज दाखल दि. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कविता नेहरा | २बी-१०२ | १४/०२/२०२५ | ७५/२०२५ | १०१२०२/- |
| २ | इंद्रजित सिग पाबला | २ए-२०४ | १४/०२/२०२५ | ८५/२०२५ | १०१२०२/- |
| ३ | नितेशकुमार राजदेव जमुआर | १बी-१०१ | १४/०२/२०२५ | ८६/२०२५ | ९७४०७/- |
| ४ | इंद्रजित सिंग पाबला | २ए-२०३ | १४/०२/२०२५ | ९२/२०२५ | ९७४०७/- |
| ५ | अब्दुल गफ्फार &असमा खातून | ४ए-००२ | १४/०२/२०२५ | ८७/२०२५ | १०१५९२/- |
| ६ | अनिकेत आदीत नितेशकुमार जमुअर | १बी-२०२ | १४/०२/२०२५ | ७६/२०२५ | १०१२०२/- |
| ७ | नितीन बगरी | १बी-३०२ | १४/०२/२०२५ | ८२/२०२५ | १०१२०२/- |
| ८ | प्रशांत डी. चव्हाण & प्रतीक्षा पी चव्हाण | २ए-४०१ | १४/०२/२०२५ | ७८/२०२५ | ८४८३३/- |
| ९ | नसरुद्दीन शेख | २बी-१०३ | १४/०२/२०२५ | ८३/२०२५ | १०१५९२/- |
| १० | गितेश विजय पाटील | २ए-२०१ | १४/०२/२०२५ | ७९/२०२५ | ९७९०८/- |
| ११ | मोहसीन याकूब खान | ४ए-२०१ | १४/०२/२०२५ | ८०/२०२५ | ९७९०८/- |
| १२ | शांती कुमारी | ३बी-२०१ | १४/०२/२०२५ | ९१/२०२५ | ९७४०७/- |
| १३ | स्मीता एस. पेंढारकर &सुभाष आत्माराम पेंढारकर | १बी-१०२ | १४/०२/२०२५ | ८८/२०२५ | ८२५९६/- |
| १४ | अभीमन्यू कुमार & निशा कुमारी ए. के | ३बी-२०२ | १४/०२/२०२५ | ८१/२०२५ | १०१२०२/- |
| १५ | अशरफ अन्सारी | २ए-४०२. | १४/०२/२०२५ | ८४/२०२५ | १०१५९२/- |
| १६ | अजिमुद्दीन नझमुद्दीन अन्सारी & शाझिया अजिमुद्दीन अन्सारी | १ बी-२०१. | १४/०२/२०२५ | ७३/२०२५ | ९७४०७/- |

हि नोटीस आज दिनांक २६/०८/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.)

शिक्का

**सही/-**
**(शिवाजी पुराव घुले)**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकरी संस्था, कर्जत जि. रायगड**

दिनांक:- २६/०८/२०२५

# सिद्धेशच्या शतकाने मुंबईला तारले

## रणजी ट्रॉफीत पहिल्या दिवसअखेर ५ बाद ३३६ धावा

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

बलाढ्य मुंबईचा संघ अडचणीत आल्यानंतर पुन्हा एकदा संकटमोचक सिद्धेश लाड धावून आला आणि मोक्याच्या वेळी त्याने शतक ठोकले. सिद्धेशच्या या झुंजार खेळीच्या जोरावर मुंबईने जम्मू-काश्मीरविरुद्ध रणजी करंडक स्पर्धेच्या आपल्या पहिल्या सामन्यात बुधवारी पहिल्या दिवसअखेर ८३ षटकांत ५ बाद ३३६ धावा अशी मजल मारली.

प्रथम फलंदाजीचे निमंत्रण मिळाल्यानंतर कर्णधार शार्दूल ठाकूरच्या नेतृत्वाखालील मुंबईची २३व्या षटकात ३ बाद ७४ धावा अशी अवस्था झाली होती. युवा सलामीवीर मुशीर खान तिसऱ्याच चेंडूवर शून्यावर बाद झाला. माजी कर्णधार अजिंक्य रहाणेही (२७) मोठी खेळी करू शकला नाही. येथून सिद्धेशने मुंबईला सावरताना सर्फराझ खानसोबत चौथ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी केली. त्यानंतर त्याने मुंबईला भक्कम स्थितीत आणताना शम्स मुलानीसोबत पाचव्या गड्यासाठी १५९ धावांची जबरदस्त भागीदारी केली.



सिद्धेशने १५६ चेंडूंत १७ चौकार व तीन षटकारांसह ११६ धावा केल्या.

दिवसाचा खेळ थांबला तेव्हा, शम्स १२५ चेंडूंत आठ चौकार व एका षटकारासह ७९, तर यष्टिरक्षक-फलंदाज आकाश आनंद ४९ चेंडूंत दोन चौकारांसह १५ धावांवर खेळत होते. युधविर सिंगने ८२ धावांत दोन बळी घेतले.

**संक्षिप्त धावफलक**

मुंबई (पहिला डाव) : ८३ षटकांत ५ बाद ३३६ धावा (सिद्धेश लाड ११६, शम्स मुलानी खेळत आहे ७९, सर्फराझ खान ४२, आकाश आनंद खेळत आहे १५; युधविर सिंग २/८२.)

**महाराष्ट्र संघाची पडझड**

महाराष्ट्र संघाची केरळविरुद्ध झालेली जोरदार पडझड धक्कादायक ठरली. केरळच्या वेगवान गोलंदाजांनी महाराष्ट्राची दिवसअखेर ५९ षटकांत ७ बाद १७९ अशी दाणादाण उडवली. मुंबईहून महाराष्ट्रात दाखल झालेल्या पृथ्वी शॉ आपल्या पदार्पणाच्या सामन्यात शून्यावर बाद झाला. महाराष्ट्राच्या पहिल्या पाच फलंदाजांपैकी चारजण शून्यावर बाद झाले. यामुळे संघाची अवस्था अवघ्या पाच धावांवर ४ गडी अशी झाली होती. ऋतुराज गायकवाडने एकट्याने किल्ला लढवला. त्याने ११ चौकारांसह शानदार ९१ धावा केल्या. जलज सक्सेनाने (४९ धावा) त्याला चांगली साथ दिली. केरळकडून एम.डी. निधीशने ४२ धावांत चार बळी घेऊन महाराष्ट्राचे कंबरडे मोडले.

**विदर्भची दमदार सुरुवात**

विदर्भाने नागालँडविरुद्ध ८५ षटकांत ३ बाद ३०२ अशी दमदार सुरुवात केली. विदर्भाचा सलामीवीर अमन मोखाडेने १४८ धावांवर नाबाद राहिला. त्याला ध्रुव शौरी (६४ धावा) आणि यश राठोड (६६*) यांनी मोलाची साथ दिली.



# रायगड बॅडमिंटन संघाला आणखी एक विजेतेपद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने आंतरजिल्हा आणि राज्य बॅडमिंटन स्पर्धेत सांघिक जेतेपदाला गवसणी घालताना पुणे संघाचा सहजपणे २-० असा पराभव केला. प्रक्रिती शर्मा आणि अनुष्का आपटे यांनी संघाच्या विजेतेपदामध्ये मोलाची भूमिका निभावली.

वसई-विरार महानगरपालिकेच्या यजमानपदाखाली झालेल्या या स्पर्धेच्या सांघिक अंतिम सामन्यातील पहिल्या लढतीत प्रक्रितीने युतिका चव्हाणचा २१-१९, २१-१५ असा पराभव करत रायगड संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर प्रक्रितीने अनुष्कासोबत दुहेरी लढतीत शरयू रांजणे-सोयरा शेलार यांचा २१-१९, ११-२१, २१-१७ असा पराभव करत रायगड संघाला २-० अशी विजयी आघाडी मिळवून देत संघाच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

संपूर्ण स्पर्धेत रायगड संघाकडून प्रक्रिती, अनुष्का यांच्यासह गाथा सूर्यवंशी, आयुषी निरवान आणि मनस्वी रनावरे यांनीही दमदार खेळ केला. हे सर्व खेळाडू मनदीप सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. विजेत्या संघाचे बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले.

# महावितरणच्या क्रीडा स्पर्धेसाठी निवड चाचणी



**मुंबई : प्रतिनिधी**

अमरावती येथे होणाऱ्या महावितरणच्या आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेसाठी सांघिक कार्यालय व भांडुप परिमंडल यांच्या संयुक्त संघातर्फे निवड चाचणी बुधवारी (दि. १५) वाशी येथील नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन येथे यशस्वीरित्या झाली.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून कार्यकारी संचालक (वितरण), धनंजय औंढेकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष व भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील, महाव्यवस्थापक (मा सं) राजेंद्र पांडे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व खेळाडू उपस्थित होते.

या निवड चाचणीत कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, कॅरम, व्हॉलीबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, ब्रिज, रेसलिंग, पॉवरलिफ्टिंग, बॉडी बिल्डिंग, १००, २००, ४००, ८००, १५००, ५००० व ४X१०० धावण्याची रिले, उंच उडी, लांब उडी, गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, टेनीकोईट या खेळांचा समावेश आहे. या चाचणीत निवड झालेले खेळाडू अमरावतीला होणाऱ्या आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेसाठी सांघिक कार्यालय व भांडुप परिमंडल यांच्या संयुक्त संघाचे प्रतिनिधित्व करतील.

कार्यक्रमात खेळाडूंचा मनोबल वाढवण्यासाठी कार्यकारी संचालक (वितरण) धनंजय औंढेकर बोलताना म्हणाले की, खेळामुळे जिद्द, चिकाटी, सहकार्यवृत्ती, समूहभावना इत्यादी गुणांची वाढ होते. म्हणून महावितरण आपल्या कर्मचाऱ्यांना अशा उपक्रमात सदैव प्रोत्साहन देते.

भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील म्हणाले, खेळ खेळताना आपण पद, वय विसरून खेळ खेळतो, जेणेकरून आपल्यात एक संघभावना निर्माण होते. भांडुप व मुख्यालयाची टीम नेहमीच प्रत्येक गोष्टीत वरचढ राहिलेली आहे. पाटील यांनी वाशी मंडळाचे व विशेषतः उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र बागुल व त्यांच्या विभागाने या निवड चाचणीला यशस्वी करण्यासाठी केलेल्या विशेष मेहनतीचेही कौतुक केले.





# सीकेटी महाविद्यालयात आंतर-महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे मुंबई विद्यापीठाच्या समन्वयाने मुले आणि मुलींची स्वतंत्र आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेचे उद्घाटन सीकेटी कॉलेजचे प्राचार्य व मुंबई शहर झोन-१चे उपाध्यक्ष डॉ. एस.के. पाटील यांनी केले. त्याचबरोबर मुंबई शहर झोन-१ सचिव डॉ. मनोज वर्मा, स्पर्धा सचिव डॉ. व्ही.बी. नाईक व सहसचिव पूनम मुजावर यांची उपस्थिती लाभली.

मुलींच्या स्पर्धेत १० महाविद्यालयातील संघानी सहभाग नोंदविला होता. यामध्ये झेवियर्स महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. पिल्लई महाविद्यालय उपविजेता ठरला. विल्सन महाविद्यालय तृतीय आणि के.जे. सोमय्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चौथ्या स्थानी राहिले.

मुलांच्या स्पर्धेत ५१ महाविद्यालयातील संघानी सहभाग घेतला होता. यामध्ये पिल्लई महाविद्यालयाने विजेतेपद प्राप्त केले. पीव्हीपी महाविद्यालयाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले, तर जी.एन. खालसा महाविद्यालय आणि सरस्वती इंजिनीरिंग महाविद्यालय अनुक्रमे तृतीय व चौथ्या स्थानी राहिले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील तसेच जिमखाना विभागाचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# भारताकडे २०३० राष्ट्रकुल स्पर्धेचे यजमानपद निश्चित

## अहमदाबादची यजमान शहर म्हणून शिफारस

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

२०३० राष्ट्रकुल खेळांचे प्रस्तावित यजमान शहर म्हणून अहमदाबादची शिफारस कॉमनवेल्थ स्पोर्टच्या कार्यकारी मंडळाने केली आहे. यामुळे दोन दशकांनंतर हा मोठा क्रीडा सोहळा भारतात परतण्याचा मार्ग मोकळा झाला आहे तसेच २०३६मध्ये ऑलिम्पिक यजमान बनण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेला बळ मिळाले आहे.

ही शिफारस आता कॉमनवेल्थ स्पोर्टच्या पूर्ण सदस्यत्वाकडे पाठवली जाईल आणि २६ नोव्हेंबर रोजी ग्लासगो येथे होणाऱ्या संस्थेच्या जनरल असेंब्लीमध्ये यावर अंतिम निर्णय घेतला जाईल. आता हा निर्णय केवळ औपचारिकता असल्याचे मानले जात आहे. भारताने यापूर्वी २०१०मध्ये नवी दिल्ली येथे पहिल्यांदा या खेळांचे आयोजन केले होते.

राष्ट्रकुल खेळांचे यजमानपद मिळणे हा भारतासाठी एक महत्त्वाचा टप्पा असेल. भारताने २०३६मध्ये ऑलिम्पिकचे यजमानपद स्वीकारण्याचेही लक्ष्य ठेवले आहे. तेदेखील अहमदाबादमध्येच प्रस्तावित आहे. २०३०च्या बोलीसाठी भारताला नायजेरियातील अबुजा शहराकडून स्पर्धा होती, पण कॉमनवेल्थ स्पोर्टने आफ्रिकन राष्ट्राच्या यजमानपदाच्या महत्त्वाकांक्षेला भविष्यातील खेळांसाठी, ज्यात २०३४चा समावेश आहे, पाठिंबा देण्यासाठी एक धोरण विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे.

कॉमनवेल्थ स्पोर्टने जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, आमच्या कार्यकारी मंडळाने अहमदाबाद या शहराची २०३०च्या शताब्दी राष्ट्रकुल खेळांसाठी प्रस्तावित यजमान शहर म्हणून शिफारस करण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रस्ताव आता कॉमनवेल्थ स्पोर्टच्या पूर्ण सदस्यत्वापुढे ठेवले जाईल आणि २६ नोव्हेंबर रोजी जनरल असेंब्लीमध्ये अंतिम निर्णय घेतला जाईल.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com